सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ११ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बिहार आणि उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाचा कहर वेगवेगळ्या घटनेत ४७ जणांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नालंदा**

बिहार आणि उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाचा कहर सुरु आहे. एकीकडे तीव्र उष्णता तर दुसरीकडे अवकाळी पावसाचा कहर असं चित्र देशातील विविध भागात पाहायला मिळत आहे. आता उत्तर प्रदेशातील काही जिल्ह्यात आणि बिहारमधील काही जिल्ह्यात जोरदार अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी वीज कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेशात वीज कोसळून आणि वादळ वाऱ्यामुळे घडलेल्या घटनांमध्ये ४७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.



तसेच बिहारमध्ये वादळामुळे घडलेल्या वेगवेगळ्या घटनेत २५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सांगण्यात येत आहे. बिहारमधील अनेक जिल्ह्यांत गारपीट झाली, तसेच अनेक ठिकाणी वीज कोसळल्याची घटना घडली. अनेक ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचं नुकसान झालं. तसेच उत्तर प्रदेशातील १५ जिल्ह्यांमध्ये गारपीट झाल्यामुळे तेथेही शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. या संदर्भातील वृत्त पीटीआयच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

दरम्यान, याबाबत बिहारच्या मुख्यमंत्री कार्यालयाने (सीएमओ) एक निवेदन जारी केलं आहे. या निवेदनानुसार, नालंदा येथे १८ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच सिवानमध्ये दोघे, कटिहार, दरभंगा, बेगुसराय, भागलपूर आणि जहानाबादमध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

बिहारमधील राजद नेते तेजस्वी यादव यांनी एक्सवर (ट्वीटर) एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये बिहारमधील पावसाच्या घटनेशी संबंधित दावा केला आहे की राज्यात पावसाशी संबंधित घटनांमध्ये ५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. तेजस्वी यादव यांनी म्हटलं की, बिहारमध्ये वादळ, पाऊस, वीज पडणे, झाड आणि भिंत कोसळणे या विविध घटनांमध्ये ५० हून अधिक लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने मला खूप दुःख झालं आहे. मी माझ्या मनातील संवेदना व्यक्त करतो. या दुःखात देव आपत्तीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना शक्ती देवो, असं तेजस्वी यादव यांनी म्हटलं आहे.

**बिहारच्या अनेक जिल्ह्यात आजही ऑरेंज अलर्ट**

भारतीय हवामान विभागाने बिहारच्या अनेक जिल्ह्यात आजही ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. यामध्ये दरभंगा, पूर्व चंपारण, गोपालगंज, पश्चिम चंपारण, किशनगंज, अररिया, सुपौल, गया, सीतामढी, शेओहर, नालंदा, नवाडा आणि पाटणा या जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये शुक्रवार आणि शनिवारी देखील मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## महात्मा फुलेंकडून मंत्र घेऊन, पंतप्रधान मोदींचे वाराणसीमध्ये महत्त्वाचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११वाराणसी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा वाराणसी लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. आज त्यांनी वाराणसीचा दौरा करत याठिकाणी ३९०० कोटी रुपयांच्या ४४ विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि लोकार्पण केले. मागच्या १० वर्षांत वाराणसीने विकासाची गती साधली असून आज काशी फक्त पुरातन शहर नाही तर प्रगतीशील शहर झाले असल्याचे ते यावेळी म्हणाले. याबरोबरच आज महात्मा जोतीराव फुले यांची जयंती (११ एप्रिल) असल्यामुळे त्यांनी फुलेंच्या कार्याचाही उल्लेख केला. आपण फुलेंच्या विचारानुसार काम करत असल्याचे ते म्हणाले.



**काय म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी?**

महात्मा जोतीराव फुले यांची आज जयंती आहे. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी आयुष्यभर नारीशक्तीच्या हितासाठी, त्यांचा आत्मविश्वास आणि समाज कल्याणासाठी काम केले. फुलेंचे विचार, त्यांचा संकल्प आणि नारीशक्तीसाठी त्यांनी सुरू केलेली चळवळ पुढे नेण्याचे काम आम्ही करत आहोत. या कामाला नवी ऊर्जा देत आहोत. महात्मा फुलेंसारख्या त्यागी, तपस्वी महापुरूषांकडून प्रेरणा घेऊनच आम्ही देशसेवेचा मंत्र जपत आहोत. 'सबका साथ, सबका विकास', हा विचार आम्ही त्यांच्याकडून घेतला, असा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

**विरोधकांवर टीका**

जे लोक सत्ता हस्तगत करण्यासाठी दिवसरात्र खेळ खेळत असतात, त्यांचा एकच संकल्प आहे. तो म्हणजे, कुटुंबाची साथ आणि कुटुंबाचाच विकास, अशा शब्दात पंतप्रधान मोदींनी विरोधकांवरही टीका केली.

## आता ऐतिहासिक किल्ले अन् सांस्कृतिक स्थळांच्या टूरसाठी सर्किट ट्रेन

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने नवा प्रकल्प

**विदर्भ प्रजततक दि.११मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक स्थळे आणि राज्यातील इतर सांस्कृतिक स्थळे पाहता यावीत याकरता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नवी योजना आणली आहे. त्यानुसार, छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू करण्यात येणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात आज माहिती दिली. केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव आज मुंबई दौऱ्यावर असताना महाराष्ट्रातील विविध रेल्वे प्रकल्पांची त्यांनी माहिती दिली. त्यावेळीच छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेनबाबत फडणवीसांनी सांगितलं.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. ज्यामध्ये सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे सुरू होईल. यामार्फत दहा दिवसांची टूर केली जाईल. छत्रपती



शिवाजी महाराजांचे किल्ले, जागा, त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळांना ही रेल्वे जोडणार आहे.

१ लाख ७३ हजार कोटी रुपये केंद्र सरकार रेल्वे इन्फ्रावर खर्च करत आहे. महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्टेशन्सच्या पुनर्विकासाचे काम हाती घेतले आहे. महाराष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या स्थानकांचं वर्ड क्लास ट्रान्स्फर्मेशन होतंय. यावर्षी २३ हजार ७०० कोटी रुपये रेल्वे बजेटमध्ये मिळाले आहेत. युपीएच्या दहा वर्षांत दहा हजार कोटी रुपये एकत्रितपणे मिळाले नाहीत. पण, आता दरवर्षी २३ हजार-२५ हजार कोटी मिळाले आहेत, अशीही माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**विदर्भातील व्यवसाय वाढवणाऱ्या रेल्वे मार्गाला मंजुरी**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, गोंदिया - बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाकरता ४ हजार ८१९ कोटी रुपये केंद्र सरकारने दिले आहेत. यामुळे निश्चितपणे विदर्भाला मोठा फायदा होणार आहे. छत्तीसगड आणि तेलंगणासाठी व्यापार, व्यवहार वाढण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची रेल्वे लाईन आहे. गोंदियातून मध्य प्रदेश आणि छत्तीसगडची सीमा आहे. त्यामुळे स्ट्रॅटेजिक लाईन मंजूर झाल्याने मी मंत्री आश्विनी वैष्णव यांचे आभार मानतो.

## उबाठाची आगामी निवडणुकांसाठी तयारी सुरू १५ एप्रिल ला अमरावतीत निर्धार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्यावतीने पश्चिम विदर्भातील निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सोमवारी (१५ एप्रिल) सकाळी १०.३० वाजता अमरावती येथील ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात होणार आहे.

या मेळाव्यात संघटनबांधणी, निवडणूक तयारी व कार्यकर्त्यांचे मनोबल वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. यावेळी संपर्कप्रमुख खासदार अरविंद सावंत, खासदार संजय देशमुख, पक्षाचे उपनेते आमदार नितीन देशमुख यांच्यासह पश्चिम विदर्भातील सर्व आमदार, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. अमरावती विभागासह अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशीम आणि वर्धा या जिल्ह्यांतील शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना या बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले आहे.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्णायक भूमिका बजावण्यासाठी ही बैठक दिशा ठरवणारी ठरणार आहे. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, गटबाजीला दूर ठेवून एकसंघपणे निवडणुका लढवण्याचा निर्धार या बैठकीत होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.शिवसेना ठाकरे गट सध्या राज्यभरात संघटनबांधणीच्या दृष्टीने सक्रिय आहे. प्रत्येक विभागात मेळावे घेतले जात आहेत. अमरावतीतील निर्धार मेळावाही याच रणनीतीचा एक भाग आहे. विदर्भातील ताकद दाखवण्याची संधी या निमित्ताने पक्षाला मिळणार आहे.मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक पातळीवर जोरदार तयारी सुरू आहे. प्रचार साहित्य, कार्यकर्त्यांची उपस्थिती आणि सभास्थळी नियोजनासाठी विविध समित्या कार्यरत आहेत. या बैठकीतून पक्षातील गतीमानता वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## प्रशांत कोरटकर कळंबा तुरुंगाबाहेर, पोलिस सुरक्षेमध्ये नागपूरात दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११कोल्हापूर**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान करणारा तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणारा प्रशांत कोरटकर आता तुरुंगाबाहेर आला आहे. दोन दिवसांपूर्वी कोल्हापूर सत्र न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता. आता तो कळंबा तुरुंगातून बाहेर आला. कोरटकरला असलेला धोका लक्षात घेता पोलिसांच्या सुरक्षेमध्ये त्याला नागपूरच्या घरी पोहोचवण्यात येणार आहे.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना फोन करून प्रशांत कोरटकरने



धमकी दिली होती. त्यावेळी त्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरले होते. याच प्रकरणात प्रशांत कोरटकरवर कोल्हापुरात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कोरटकरला सुरुवातीला पाच दिवस पोलिस कोठडी तर नंतर १२ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. आता त्याला जामीन मंजूर करण्यात आला आहे. दोन दिवसांपूर्वी कोरटकरला जामीन मिळाला होता. पण न्यायालयीन प्रक्रिया आणि एका दिवसाची सुट्टी असल्याने कोरटकरचा मुक्काम वाढला होता. आता कोरटकरला तुरुंगाबाहेर काढण्यात आलं आहे.

**पोलिस सुरक्षेत नागपूरपर्यंत पोहोचवणार?**

प्रशांत कोरटकरच्या जीवाला धोका असल्याचा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी केला होता. कोरटकरला पोलिस सुरक्षेमध्ये नागपूरपर्यंत पोहोचवण्यात यावं अशी मागणीही त्यांनी केली होती. न्यायालयाने ती मागणी मंजूर केली. प्रशांत कोरटकरला आता पोलिस सुरक्षेमध्ये नागपूरच्या घरी पोहोचवण्यात आले आहे.

## भीक नाही हक्काचे पैसे मागतोय, अजितदादांवर मंत्री सरनाईक नाराज; एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा वाद वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या एका वक्तव्याने महायुती सरकारमधील धुसफूस पुन्हा समोर आली आहे. एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून पुरेसा निधी दिला जात नाही. आम्ही पाठवलेली फाईल वित्त विभागाचे अधिकारी परस्पर माघारी पाठवतात. फाइल मंत्र्यांपर्यंत सुद्धा पोहचत नाही. हे योग्य नाही अशा शब्दांत मंत्री सरनाईक यांनी नाराजी व्यक्त केली. एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्त झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत प्रताप सरनाईक बोलत होते.

सरनाईक पुढे म्हणाले, एसटी



महामंडळ अतिरिक्त पैसे मागत नाही. आम्ही तर आमच्या हक्काचे पैसे मागतोय. आम्ही भीक मागत नाही. पीएफचे पैसे वापरू शकत नाही. ते पैसे वापरले तर आम्हाला तुरुंगात जावं लागेल. सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचाही पगार वेळेत झाला पाहीजे. आम्ही पाठवलेली फाईल ही वित्त विभागाचे अधिकारी परस्पर माघारी पाठवतात. फाइल मंत्र्यांपर्यंत सुद्धा पोहचत नाही. हे योग्य नाही.

**आता वित्त विभागातच जाऊन बसणार**

अजितदादांनी मला बोलावून घेतले होते त्यांना मी त्यावेळी वास्तव परिस्थिती सांगितली होती. कोणत्याही परिस्थितीत एसटी कर्मचाऱ्यांचे पगार ७ तारखेला झालेच पाहिजेत. मीच आता दर महिन्याला ५ तारखेला वित्त विभागात जाऊन बसणार आहे. त्यांना पण कळू दे की मंत्र्याला येथे यावं लागतं अशा शब्दांत त्यांनी वित्त विभागाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

## रुग्णाला काय अमृत पाजलंय का? डेंग्यूच्या रुग्णाला सहा लाखांचे बिल, संतोष बांगर डॉक्टरांवर भडकले


**विदर्भ प्रजासत्ताक दि.११हिंगोली**

डेंग्यू झालेल्या रुग्णाला सहा लाखांचे बिल पाठवले, त्याला काय अमृत पाजलं का असा शब्दात शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांनी डॉक्टरांना फैलावर घेतलं. रुग्णाची कंडिशन कशीही असो, पण सहा लाखांचे बिल देऊन त्यांना लुटू नका असंही ते म्हणाले. या संबंधी एक ऑडिओ कॉल व्हायरल होत आहे. एबीपी माझा या व्हायरल ऑडिओ क्लिपची कोणतीही पृष्ठी करत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील आदिती सरकटे यांच्यावर डेंग्यू झाल्याने छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते. या उपचारादरम्यान त्यांना एकूण सहा लाखांचे बिल देण्यात आले.डेंग्यूच्या रुग्णाला एवढे बिल कसे काय असा प्रश्न करत संतोष बांर यांनी डॉक्टरांना चांगलंच झापलं. सहा लाखांचे बिल केला, तुम्ही रुग्णाला काय अमृत पाजला का असा प्रश्नही त्यांनी विचारला.

## कांद्याला चांगला भाव मिळाला की शेतकरी कांदाच लावत सुटतात:कृषी मंत्री कोकाटे यांचे पुन्हा वादग्रस्त वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**



कांद्याला चांगला भाव मिळाला की, शेतकरी कांदाच लावत सुटतात. त्यानंतर कांद्याचे भाव पडतात, असे म्हणत राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर थेट नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे आता कोकाटे पुन्हा एकदा टीकेचे धनी ठरले आहेत. या आधी देखील कोकाटे यांच्या वक्तव्यावरुन त्यांच्यावर निशाणा साधण्यात आला होता. आता पुन्हा एकदा त्यांच्या या वक्तव्यामुळे वाद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महायुती सरकारमध्ये कृषिमंत्री सारखे महत्त्वाचे खाते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. मात्र, विद्यमान कृषिमंत्री कायमच त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत राहत आहेत. त्यामुळे विरोधकांच्या हातात आयते कोलीत देण्याचे काम त्यांच्याकडून होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे नुकत्याच झालेल्या पक्षाच्या बैठकीत अजित पवार यांनी कोकाटे यांना चांगलेच खडसावले होते. मात्र, तरी देखील कोकाटे यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुन त्यांनाच दोषी ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.

## संपादकीय ......

# राज्यपालांच्या एजंटगिरीला चाप

केंद्रातील सत्ताधार्यांच्या आशीर्वादाने घटनात्मक पदावर वर्णी लावून त्यांच्याच इशार्याने राज्यातील सत्ताधार्यांना त्रास देण्याचे काम करणार्या राज्यपालांना सर्वोच्च न्यायालयाने चांगलाच दणका दिला आहे. तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी राज्य सरकारने मंजूर केलेली १० विधेयके अडवून ठेवली होती. राज्यपालांची ही कृती असंवैधानिक असल्याचे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने आर.एन. रवी यांच्यावर चांगलेच ताशेरे ओढले आहेत.

सत्ताधार्यांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर कुठलाही निर्णय न घेता राज्यपालांकडून ती विधेयके राजकीय हेतूने प्रलंबित ठेवण्याचे प्रकार आजकाल खूपच वाढत आहेत. महाराष्ट्रात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या सत्ताकाळातील राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, पश्चिम बंगालमध्ये तत्कालीन तृणमूल काँग्रेस सरकारच्या सत्ताकाळात तत्कालीन राज्यपाल जगदीप धनखड आणि दिल्लीत तत्कालीन आम आदमी पक्षाच्या सत्ताकाळातील नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनीही असे उपद्व्याप केले होते. ज्यामुळे राज्य सरकार आणि राज्यपालांमध्ये सातत्याने कुरबुरी सुरू असायच्या.

महाराष्ट्रात विधान परिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांची यादी राज्य सरकारकडून मिळूनही भगतसिंह कोश्यारी या यादीवर तब्बली दीड वर्षांहून अधिक काळ मांडी घालून बसले होते. मुंबई उच्च न्यायालयाने कठोर शब्दात सुनावूनही कोश्यारी कान पाडून गप्प होते. यादीवर निर्णय घेण्यासाठी संविधानाने कुठलीही कालमर्यादा आखून दिलेली नसल्याने राज्यपालांनी आपल्या विवेकबुद्धीचा वापर करुन निर्णय घेणे अपेक्षित होते. याच पळवाटेचा गैरफायदा कोश्यारींनी उचलला आणि अखेरपर्यंत या यादीवर निर्णय झालाच नाही.

मविआचे सरकार पाडण्यात आणि महायुतीचे सरकार स्थापन करण्यात भगतसिंह कोश्यारींच्या असंवैधानिक कृतीची कशी मदत झाली, याचे दाखले तर खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच दिले आहेत. तरीही या घटनात्मक पदाचा दुरुपयोग सुरूच आहे. राष्ट्रपती जसे राष्ट्राचे प्रमुख असतात, त्याचप्रमाणे राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात. राष्ट्रपती वेगवेगळ्या राज्यांमध्ये राज्यपालांची नियुक्ती करत असले, तरी ही नियुक्ती केंद्राच्या सल्ल्यानुसार होत असल्याने राज्यपालांच्या राजकीय तटस्थतेवर आणि निष्पक्षतेवर सुरूवातीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आले आहे.

याआधीही काँग्रेस वा आघाडी सरकारच्या काळात राज्यपालांच्या भूमिकेवर आक्षेप घेण्यात येत होते, तीच परिस्थिती भाजपप्रणित एनडीए सरकारच्या काळातही सुरू आहे. राज्यपालांना संविधानानुसार विविध भूमिका आणि अधिकार आहेत, जसे की राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांना मान्यता देणे, मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांची नियुक्ती करणे, राष्ट्रपतींना राज्यातील परिस्थितीबद्दल अहवाल पाठवणे आणि काही राज्यांमध्ये विशेष जबाबदार्या बजावणे.

मात्र, या भूमिका आणि अधिकार बहुतेकदा राज्यपालांच्या विवेकबुद्धीच्या अधीन असल्याने या भूमिका बजावताना निवडून आलेल्या राज्य सरकारशी त्यांचा संघर्ष होतो. यामागचे कारणही स्पष्ट आहे, विरोधी पक्षाचे सरकार असलेल्या राज्यात लक्ष ठेवण्यासाठी किंवा राजकीय गुंतागुंत निर्माण करण्याच्या उद्देशानेच त्यांना केंद्राकडून पाठवलेले असते.

त्यामुळे बहुतांश राज्यपाल हे केंद्र सरकारचे एजंट म्हणून काम करीत असतात. परिणामी त्यांचा आणि सत्ताधार्यांचा उघड संघर्ष सुरू असतो. तामिळनाडूमध्येही काही वेगळे सुरू नव्हते. राज्यपाल आर. एन. रवी यांनी तामिळनाडू सरकारची १० विधेयके अडवून ठेवली होती. यातील सर्वात जुने विधेयक जानेवारी २०२० चे आहे. त्यातही महत्त्वाचे म्हणजे यातील अनेक विधेयकांना विधानसभेने पुन्हा मंजुरी देऊन राज्यपालांकडे पाठविले होते.राज्यपालांनी परत पाठवलेल्या विधेयकावर विधानसभेने पुनर्विचार करून ते विधेयक दुसर्यांदा राज्यपालांकडे पाठविल्यानंतर त्याला मान्यता द्यावीच लागते. पहिल्या विधेयकापेक्षा दुसरे विधेयक वेगळे असेल तरच अपवाद म्हणून त्याकडे पाहता येते. मात्र,तरीही राज्यपालांनी दीर्घकाळ या विधेयकांवर निर्णय घेतला नाही. ही विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठविणार असल्याचे कारण राज्यपाल रवी सातत्याने देत राहिले.राज्यपालांची ही कृती बेकायदेशीर आणि कायद्याचे उल्लंघन असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश. जे. बी. पारदीवाला आणि न्यायाधीश. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. तसेच राज्यपालांकडे दुसर्यांदा विधेयके सादर केल्याच्या तारखेपासून ही विधेयके मंजूर झाल्याचे मानले जाईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केले आहे. लोकशाहीत आमदारांना जनतेने निवडून दिलेले असते. त्यामुळे सत्ताधार्यांच्या अधिकारावर राज्यपाल अतिक्रमण करू शकत नाहीत.संविधानात कालमर्यादेचा उल्लेख नसला तरी राज्यपाल अनंत काळासाठी विधेयकांना अडकवून ठेवू शकत नाहीत. विधेयके अडवण्याचा कोणताही विशेष अधिकार राज्यपालांकडे नाही. संविधानानुसार त्यांना सत्ताधार्यांच्या सल्ल्याने काम केलेच पाहिजे. राज्यपालांनी संसदीय लोकशाहीच्या परंपरांचा आदर राखून वागले पाहिजे.

जनतेने निवडून दिलेल्या सरकारचा आदर राखायला हवा. राज्यपालांनी मित्र, तत्त्वज्ञ या नात्याने संविधानाद्वारे घेतलेल्या शपथेद्वारे आपली भूमिका पार पाडणे अपेक्षित आहे, प्रत्यक्षात राज्य सरकारने पारित केलेली विधेयके रोखून ठेवण्याची राज्यपालांची कृती म्हणजे विधानसभेचा गळा दाबण्यासारखीच आहे.राज्य सरकारचे अधिकार कमकुवत होतील, अशा निर्णयांना आम्ही समर्थन देणार नाही, असे तामिळनाडूच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही कोश्यारींच्या घटनाबाह्य कृतीवर वेळीच निर्णय दिला असता, तर कदाचित महाराष्ट्रात राजकीय सत्तासंघर्षाची वेळ आली नसती. असो. सर्वोच्च न्यायालयाने तरी तामिळनाडूच्या राज्यपालांच्या एजंटगिरीला वेळीच चाप लावला, हेही नसे थोडके.

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सुधारित निर्णयामागे 'नूटा संघटने'चा ठाम पाठपुरावा !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** –१० एप्रिल २०२५ – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उन्हाळी–२०२५ सत्रातील पदवी व पदव्युत्तर प्रात्यक्षिक परीक्षा २० एप्रिल ते १९ मे २०२५ या कालावधीत घेण्याचे सुधारित परिपत्रक आज प्रसिद्ध केले. याआधी या परीक्षा ७ मे ते १९ मे २०२५या कालावधीत आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, यश नूटा संघटनेच्या शिष्टमंडळाने केलेल्या सविस्तर निवेदनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने आपला निर्णय सुधारित केला आहे.



विद्यापीठाच्या अकॅडमिक कॅलेंडरनुसार सत्र २०२५– २०२६ चे ४ जून २०२५ पासून सुरू होते आहे.

दरवर्षी अकॅडमी कॅलेंडरमध्ये दिवाळी सुट्टी आणि उन्हाळी सुट्टीची कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे शिकवणीचे दिवस, प्रात्यक्षिक परीक्षा,अंतिम परीक्षा आणि इतर सुट्यांचे दिवस सुद्धा निश्चित केलेल्या असतात. हे सर्व निश्चित असताना प्रात्यक्षिक परीक्षा वेळेवर न घेणे अमानवी वाटते. प्रात्यक्षिक परीक्षा उशिरा घेणे शैक्षणिकदृष्ट्या तसेच तांत्रिकदृष्ट्या अयोग्य आहे, असे नूटा संघटनेचे स्पष्ट मत होते.

अनेक महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राध्यापकांची संख्या अपुरी असल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याची जबाबदारी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांवर येते. परंतु तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांची मान्यता ३० एप्रिलपर्यंतच असते. परिणामी, ३० एप्रिल नंतर तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना सह–संचालक कार्यालयातून वेतन मंजूर होत नाही.सोबतच विद्यापीठाचे मान्यता सुद्धा तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांसाठी ३० एप्रिल पर्यंतच असते.


या समस्येकडे विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नूटा संघटनेच्या शिष्टमंडळाने दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी विद्यापीठ कुलगुरूंना निवेदन सादर केले. या शिष्टमंडळात नूटा संघटनेचे अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे, डॉ. सुभाष गावंडे, डॉ. नितीन टाले, डॉ.ज्ञानेश्वर नामूर्ती, प्रा. कैलास चव्हाण, डॉ. तीर्थराज राय, डॉ. गजेंद्र रघुवंशी, डॉ. सरपाते आणि डॉ. शिवाजी कानफाडे यांचा समावेश होता.

तेव्हा विद्यार्थ्यांचे आरोग्य, प्राध्यापकांच्या शैक्षणिक सुट्ट्या आणि नियोजित वेळापत्रकाचा आदर राखत, विद्यापीठाने नूटा संघटनेच्या मागणीनुसार तातडीने सुधारित परिपत्रक दिनांक १० एप्रिल २०२४ रोजी प्रसिद्ध करून परीक्षा २० एप्रिलपासून घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय निश्चितच संघटनेच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे शक्य झाला आहे, असे शैक्षणिक वर्तुळात मानले जात आहे.

दरवर्षी वार्षिक नियोजनानुसार परीक्षा कालावधी निश्चित असूनही, अशा स्वरूपाचे वेळापत्रक वारंवार ढकलल्यास विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. यामुळे शिक्षण व्यवस्थेबद्दल उदासीनता वाढत असून, विद्यार्थीवर्गात असंतोषाची भावना दिसून येते. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने आता यासंदर्भातील निर्णय अधिक नियोजनपूर्वक घेणे आवश्यक असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.




## जिमला न जाता अशी कमी करा पोटाची चरबी, वापरा ही सोपी ट्रिक्स



**दि.११ विदर्भ प्रजासत्ताक :** पोटाची चरबी कमी करण्यासाठी अनेक उपाय आहेत. दरम्यान, यासाठी एक्सरसाईज गरजेची आहेत. मात्र ज्यांना जिममध्ये जाऊन एक्सरसाईज करायची नाही आहे मात्र पोट कमी करायचे आहे तर अशा लोकांसाठी खाली काही पद्धती दिल्या आहेत. ज्यांनी तुम्ही पोट कमी करू शकता.

**शुगर कमी करा** – साखरेचे सेवन न केल्याने तुम्ही पोटाची चरबी कमी करू शकता. साखरेचे कोल्ड्रिंक्स पिण्याऐवजी बिन साखरेचा चहा अथवा ब्लॅक कॉफी प्या. तसेच साखरेचे पदार्थ टाळा.

**प्रोटीन आणि फायबर खा** – पोटाची चरबी कमी करण्यासाठी प्रोटीन आणि फायबरयुक्त डाएटचे सेवन करा. या पोषकतत्वामुळे पचनास मदत होते. तसेच पोट दीर्घकाळ भरलेले राहते. यामुळे वजन घटवण्यासही मदत होते.

**पुरेसे पाणी प्या** – पाणी प्यायल्याने पोटाची चरबी कमी होण्यास मदत होते. पाणी प्यायल्याने शरीराची चरबी कमी होते आणि तुमचे पोट हेल्दी राहते. कमीत कमी ८ ते १० ग्लास पाणी दररोज प्यायले पाहिजे.

**पुरेशी झोप** – तणावामुळे तुमच्या पोटाची चरबी वाढू शकते. दरम्यान,पुरेशी झोप घेण्याचा प्रयत्न करा. झोप पूर्ण न झाल्याने कार्टिसोल हार्मोन वाढते यामुळे वजन घटवण्यास अडथळा निर्माण होतो.

# बदलत्या हवामानात पिकांची अशी घ्या काळजी वाचा कृषी सल्ला सविस्तर

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

मागील काही दिवसांपासून हवामानात अनेक बदल होताना दिसत आहेत. कधी अवकळी पावसाच्या सरी बरसतात तर कधी उष्णतेचा पारा चढताना दिसत आहे. त्यामुळे बदलत्या हवामान कशी काळजी घ्यावी यासंदर्भात वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने शिफारशी जारी केल्या आहेत त्या वाचा सविस्तर

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवसात मराठवाड्याच्या दक्षिण– पूर्व भागात तुरळक ठिकाणी वादळीवाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्हयात तुरळक ठिकाणी रात्र उबदार राहील. मराठवाड्यात पुढील २ ते ३ दिवसात कमाल तापमानात हळूहळू १ ते २ अंश सेल्सिअसने वाढ होऊन त्यानंतर हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची तर पुढील ३ दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होऊन त्यानंतर फारशी तफावत जाणवणार नाही.

**सामान्य सल्ला :** विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाड्यात ११ ते १७ एप्रिलदरम्यान पाऊस सरासरीएवढा, कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. सॅक, इसरो अहमदाबाद यांच्या उपग्रहाच्या बाष्पोत्सर्जनाच्या जिल्हानिहाय व तालूकानिहाय छायाचित्रानुसार मराठवाड्यात बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला आहे.

**संदेश :** वाढत्या तापमानामुळे व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामुळे पिकात, फळबागेत, भाजीपाला व फुल पिकास आवश्यकतेनुसार सकाळी किंवा संध्याकाळी पाणी व्यवस्थापन करावे.वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ज्ञ समितीने पुढील प्रमाणे कृषि हवामान आधारीत कृषि सल्ल्याची शिफारश केली आहे.

**पीक व्यवस्थापन**

मळणी केलेल्या रब्बी ज्वारी व गहू पिकाच्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

काढणीस तयार असलेल्या हळद पिकाची काढणी करून घ्यावी. काढणी केलेल्या हळद पिकाची उकडणे, वाळवणे व पॉलीश करणे ही कामे करून मालाची सुरक्षित ठिकाणी (गोदामात) साठवणूक करावी.

उन्हाळी भुईमूग पिकात आवश्यकतेनुसार तुषार सिंचन पध्दतीने पाणी व्यवस्थापन करावे. उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या (मावा, तुडतुडे, फुलकीडे व पांढरी माशी) किडींना आकर्षित करण्यासाठी एकरी १० ते १२ पिवळे व निळे चिकट सापळे लावावेत व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचे व लाल केसाळ अळीचे समूहातील अंडी लहान अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.

उन्हाळी भुईमूग पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंचा झाडिरेक्टिन (३० पीपीएम) ३ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फळबागेचे व्यवस्थापन**

घड लागलेल्या केळी झाडांना काठीने आधार द्यावा. काढणीस तयार असलेल्या केळीच्या घडांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी. केळी बागेस आवश्यकतेनुसार सरी वरंब्याने पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी केळी फळझाडाच्या आळ्यात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या केळीच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची काढणी लवकरात लवकर करून घ्यावी.




आंबा बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी व जमिनीचे तापमान संतुलित राहण्यासाठी आंबा फळझाडाच्या आळ्यात आच्छादन करावे. नविन लागवड केलेल्या आंब्याच्या रोपांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी रोपांना सावली करावी. आंबा बागेत जिब्रॅलिक सिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.


काढणी राहिलेल्या द्राक्ष फळांची काढणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत एप्रिल छाटणीची पुर्व तयारी करून घ्यावी. द्राक्ष बागेतील माती मोकळी करून खत व्यवस्थापन करावे.

**भाजीपाला** काढणीस तयार असलेल्या भाजीपाला, टरबूज, खरबूज पिकांची काढणी करून घ्यावी. भाजीपाला पिकात खूरपणी करून भाजीपाला पिक तण विरहीत ठेवावे. नविन लागवड व पुर्नलागवड केलेल्या रोपांना आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. भाजीपाला ( मिरची, वांगे व भेंडी) पिकात रसशोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन ५% + फेनप्रोपाथ्रीन १५% १० मिली किंवा डायमेथोएट ३०% १३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**फुलशेती** फुल पिकात खुरपणी करून फुल पिक तण विरहीत ठेवावे. काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करून बाजारपेठेत पाठवावी.

**(सौजन्य : मुख्य प्रकल्प समन्वयक, ग्रामीण कृषी मौसम सेवा,वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी)**

# पुढील चार दिवस निसर्गाचे थैमान अमरावतीला अवकाळी पावसाचा यलो अलर्ट



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.११अमरावती**

अमरावतीसह विदर्भातील अन्य जिल्ह्यात आगामी चार दिवसात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सध्या तापमानाचा उद्रेक होत असून अमरावतीसह विदर्भातील अन्य जिल्ह्यांनी ४० पेक्षा अधिक पारा गाठला आहे. अमरावतीत ४२.०, अंशाची तर अकोल्यात ४३.७ अंशांची नोंद झाली आहे.नंदूरबारमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.३ अंशांवर

## विदर्भातील अन्य जिल्ह्यातहीं अवकाळीचा इशारा

स्थिरावला आहे. संपूर्ण राज्यात उष्णतेचा दाह वाढला आहे. दरम्यान, हवामान विभागाने विदर्भात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. आजपासून पुढील ३ दिवस अवकाळी पाऊस होणार असूनतापमानापासून काहीसा दिलासा मिळणार आहे. मध्य महाराष्ट्रातही सध्या तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. मराठवाड्यातही प्रचंड तापमान नोंदवले जात आहे. महाराष्ट्रात सध्या तापमानाचा उच्चांक झाला आहे. पश्चिम विदर्भासह पूर्व विदर्भातील वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांनाही अवकाळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ११ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


## एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार पूर्ण पगार

### कामगार संघटना आक्रमक झाल्यानंतर प्रशासन ताळ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई :** एसटी कर्मचाऱ्यांना मार्चच्या पगाराची उर्वरित ४४ टक्के रक्कम येत्या मंगळवारपर्यंत देण्यात येणार आहे. फक्त ५६ टक्के वेतन मिळाल्याचे वृत्त पसरल्यामुळे एसटी संघटना आक्रमक झाल्या होत्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेऊन वित्त सचिवांशी चर्चा केल्यानंतर प्रश्न मार्गी लागला आहे.एसटीच्या ८७ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचा निम्माच पगार मिळाल्यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे उर्वरित पगार तत्काळ न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला होता. अपुऱ्या निधीमुळे केवळ ५६ टक्के पगार दिल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. आता या निम्म्या पगारात घर कसे चालवणार, असा प्रश्न कर्मचाऱ्यांसमोर उभा राहिला होता. महामंडळाने शासनाकडे १ हजार ७५ कोटींच्या प्रतिपूर्ती रकमेचा प्रस्ताव पाठविल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.




कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी दर महिन्याला ४०० कोटींपेक्षा जास्त आणि हातात मिळणाऱ्या वेतनासाठी २५० कोटींपेक्षा अधिक रकमेची गरज असते. शासनाकडून गेल्या महिन्याची प्रतिपूर्ती रक्कम २७२ कोटी ९६ लाख रुपये मिळाले होते. त्यातील ४० कोटी एसटी बँकेला दिले, तर काही रक्कम पीएफसाठी दिल्याने महामंडळाकडे मार्चच्या पगारासाठी १३५ कोटी उरले होते. शासनाकडून पुरेसा निधी मिळत नसल्याने पगारासाठी पैसे नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

**पगार दहा दिवसांत करा; अन्यथा मंत्रालयावर मोर्चा**

शासनाच्या वित्त विभागाकडून महामंडळाला पुरेसा निधी देण्यात येत नाही. याला सर्वस्वी शासनाचे अर्थखाते जबाबदार आहे. येत्या १० दिवसांत पगारासाठी पैसे न मिळाल्यास मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला होता.एसटी कर्मचारी ४० ते ४५ अंश सेल्सिअस इतक्या तापमानात अहोरात्र काम करून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करतात. अशा परिस्थितीही संपूर्ण वेतन मिळत नसल्याने कामगारांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे तातडीने हे शंभर टक्के वेतन न दिल्यास आंदोलन केले जाईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिला होता.

## सुतारवाडीत अमित शहा तटकरेंकडे भोजनाला जाणार

### चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, एकनाथ शिंदेंसह गोगावलेंना नाराज होण्याचं कारण नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती–** नाशिक आणि पालघरच्या पालकमंत्री पदाचा तिढा अजूनही राज्यात सुरुच आहे. नाशिकच्या पालकमंत्रीपदाला देण्यात आलेली स्थगिती अजून कायम असून आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यात रायगडच्या पालकमंत्रीपदाचा प्रश्न सुटणार असल्याची चर्चा आहे. आता पालकमंत्रीपद भरत गोगावले यांना मिळणार की अदिती तटकरे यांना मिळणार याची चर्चा सुरु झाली आहे दरम्यान, या दौऱ्यात गृहमंत्री अमित शहा अजित पवार गटाचे खासदार सुनिल तटकरे यांच्या घरी भोजनासाठी जाणार आहेत. या भेटीवरून राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे दिसले. दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे या भेटीचा राजकीय अर्थ काढू नका. गृहमंत्री अमित शहा जर तटकरेंच्या घरी जात असतील तर गोगावले, एकनाथ शिंदे आम्हाला नाराज होण्याचं कारण नाही. असं बावनकुळे म्हणालेत.

शिवाय गेल्या अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून सरकारला विरोधकांनी घेरल्याचे चित्र होते. यावरही त्यांनी 'आमचं सरकार योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल,जेव्हा आम्ही निवडणुकीला समोर जाऊ तेव्हा, आमच्या संकल्प पत्रा मधला एकही मुद्दा शिल्लक राहणार नाही,जो वचननामा आम्ही जनतेला मतं घेताना दिला तो विकास आम्ही करू' असं आश्वासन दिलंय.



अमित शहांच्या भेटीचा राजकीय अर्थ काढू नका: चंद्रशेखर बावनकुळे

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. १२ एप्रिलला ते रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येतील. सुतारवाडीला मंत्री सुनिल तटकरेंच्या घरी भोजनाला जातील. यावर बावनकुळे म्हणाले,'आमच्या अमित भाई शहा यांनी महायुतीतील एका पक्षाच्या अध्यक्षाला वेळ दिला आहे.हे आमचे संस्कार आहे. अमित शहा जर तटकरेंच्या घरी जात असेल तर गोगावले एकनाथ शिंदे,आम्ही नाराज होण्याच कारण नाही.

सुनील तटकरे यांनी महायुतीच्या सर्वच पक्षाच्या लोकांना निमंत्रण दिल आहे,एकनाथ शिंदेंना निमंत्रण दिला आहे ,गोगावलेंना निमंत्रण दिलाय मलाही निमंत्रण दिलं आहे. या भेटीचा राजकीय अर्थ कोणी काढू नये. असेही बावनकुळे म्हणाले.

आम्ही जेव्हा महाराष्ट्र राज्याच्या निवडणुकीला समोर गेलो तेव्हा आम्ही संकल्प केला होता,आणि त्यामध्ये आम्ही पाच वर्षात शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं सांगितलं होतं.

त्या संकल्प मध्ये ज्या ज्या गोष्टी आम्ही सांगितल्या होत्या त्या गोष्टी पाच वर्षात आम्ही पूर्ण करू असं सांगितलं होतं.. त्यामध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी होती.आमचं सरकार योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल,जेव्हा आम्ही निवडणुकीला समोर जाऊ तेव्हा, आमच्या संकल्प पत्रा मधला एकही मुद्दा शिल्लक राहणार नाही,जो वचननामा आम्ही जनतेला मतं घेताना दिला तो विकास आम्ही करू असे बावनकुळे म्हणाले. आमचा संकल्पना नामा १००%आहे ,आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी करू. शंकर संकल्पनांमध्ये जो आम्ही शब्द दिला आहे ते आमचं महायुतीचे सरकार पूर्ण करेल असे आश्वासनही त्यांनी दिले.–

## बच्चू कडूंना पहाताच अजित पवारांचा पारा का चढला?

### पुरंदर विमानतळ प्रकल्पावरून दोघांमध्ये चांगलीच खडाजंगी!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई : –** दिव्यांगांच्या मागण्यांबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीसाठी माजी आमदार बच्चू कडू आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकाच वेळी पोहोचले आणि तिथेच दोघांमधे शाब्दिक सामना रंगला. त्यामुळे बैठकीपेक्षा अधिक चर्चा यावरच सुरु आहे.पुरंदर विमानतळ प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या भूमी अधिग्रहणाविरोधातील आंदोलनात बच्चू कडू यांचा सहभाग पाहून अजित पवारांनी त्यांच्यावर सूचकपणे टीका केली. तुम्ही त्या आंदोलनात लक्ष घालू नका! असे दादा म्हणाले आणि बस्स, तिथूनच दोघांमध्ये खडाजंगी सुरु झाली. अजित पवारांनी बच्चू कडूंना आंदोलनात न पडण्याचा सल्ला दिला. त्यावर कडूंनी स्पष्ट उत्तर दिलं की, मला शेतकऱ्यांनी बोलावलंय, त्यामुळे मी जाणारच. यावर अजित पवार म्हणाले की, शेतकऱ्यांना अधिक मोबदला दिला जाईल. मात्र, कडूंनी जरा वेगळाच मुद्दा मांडला. शेतकरी जर पूर्णपणे विस्थापित होणार असतील, तर असा प्रकल्पच नको! आणि जर खासगी विमाने उडणार असतील, तर शेतकऱ्यांना मोबदल्याबरोबर भागीदारीही द्या!पुरंदर तालुक्यातील सात गावांतील जमिनी या प्रकल्पासाठी घेण्यात येणार आहेत. यावर गावकऱ्यांनी जोरदार विरोध केला असून याआधी तीन दिवस उपोषणही करण्यात आले. आता शेतकऱ्यांनी बच्चू कडूंना २० एप्रिलला आंदोलनात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले आहे आणि त्यांनीही होकार दिला आहे.ब्रम्हदेव आले तरी हा प्रकल्प करणारच! अशी जाहीर घोषणा करणाऱ्या अजित पवारांसमोर आता बच्चू कडूंचा सहभाग एक मोठा राजकीय इशारा मानला जातोय.त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, बच्चू कडू शेतकऱ्यांच्या आंदोलनात ठाम राहणार का? की सरकार त्यांच्या पाठिंब्याची वाट पाहत 'मनधरणी' करणार? शेतकऱ्यांना दिलेला शब्द ते पाळणार की उपमुख्यमंत्र्यांना सकारात्मक प्रतिसाद देणार? या साऱ्या घडामोडींवर सध्या संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे!



**याआधीही झाली होती 'तू तू मैं मैं'**

अजित पवार आणि बच्चू कडू यांच्यात याआधीही 'तू तू मैं मैं' झाल्याचे पाहायला मिळाले होते. अमरावती विभागाच्या वार्षिक नियोजनाच्या बैठकीदरम्यान हा प्रकार घडला.

अमरावती विभागाच्या वार्षिक नियोजनाची बैठक अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अकोला जिल्ह्याला दिलेल्या निधीवर बच्चू कडू समाधानी नव्हते. परिणामी अजित पवार यांच्या निधी वाटपावर बच्चू कडू यांनी आक्रमक होत नाराजी व्यक्त केली.

## वन्यप्राण्यांनाही तीव्र पाणी टंचाईच्या झळा, पाणवठ्यांवर टँकरने पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटल्याने वन्य प्राण्यांना देखील पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यातच कृत्रिम पाणवठेही कोरडे पडल्याने पाण्याअभावी वन्य प्राण्यांची पाण्यासाठी पळापळ सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मागील दहा बारा वर्षांपासून मेळघाटातील बारमाही वाहणाऱ्या नदी, नाले आपले अस्तित्व गमावून बसले आहे. नैसर्गिक पाणवठे आटत चालले आहेत.वनविभागाने जंगलातील अनेक ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार केल्याने वन्यप्राण्यांची तृष्णातृप्ती होत आहे. वनविभागाकडून आता कृत्रिम पाणवठ्यांवर टँकर तसेच सोलर पंपांद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू झाला आहे.नैसर्गिक अधिवासाला पहली पंसती देणारे वन्यप्राणी जलस्रोत आटल्यामुळे अधिवास सोडून स्थलांतरित करण्याची शक्यता असते. सध्या कृत्रिम पाणवठ्यावर आपली तहान भागविण्यासाठी वन्यप्राणी हे जंगलात भटकत असल्याचे चित्र दिसत आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यप्राण्यांची तहान भागविण्यासाठी अनेक नैसर्गिक पाणवठे आहेत. पण यंदा वाढत्या उन्हामुळे हे नैसर्गिक स्रोत आटले आहेत.मेळघाटातील सिपना, गडगा, मेलडोह, खंडू, खापरा, राजादही, डवाल, कुकरी अशा जंगलातून निघालेल्या नद्यांचा प्रवाह एप्रिल सुरू होण्याच्या



आधीच आटला. त्यामुळे वनअधिकारी वन्यप्राण्यांच्या मदतीला धावून आले आहेत. रखरखत्या उन्हाळ्यात व्याघ्र प्रकल्पातील अधिकारी, कर्मचारी, वनपाल, पाणवठ्यात टँकरने पाणी पुरवठा करताना दिसत आहेत. हतरू, रायपूर, जारीदा, सेमाडोह, हरिसाल, चौराकुंड, तारूबांदा, हरिसाल, सेमाडोह येथील वनपरिक्षेत्र अधिकारी आपल्या ताफ्यासह या पाणवठ्यावर लक्ष केंद्रित करून वन्यप्राण्यांच्या पाण्याची व्यवस्था करीत आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या समोरील पाणी टंचाईची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली आहे.मेळघाटात भरपूर पाऊस होत असला तरी सर्व पाणी डोंगरावरून खाली वाहून जात असल्याने या भागात पाण्याची मोठी टंचाई असते. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात वाघ, बिबट, अस्वल, रानगवे, सांबार, हरिण, नीलगाय या वन्यप्राण्यांसह विविध पक्ष्यांच्या तृष्णातृप्तीसाठी कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आले आहेत.जंगलात ज्या भागात उन्हाळ्यातही पाणी असणारी विहीर आहे, यासह ज्या भागात बोअर आहे, अशा ठिकाणावरून सौर ऊर्जेचा वापर करून सिमेंट बशी आणि कृत्रिम पाणवठ्यात पाणी आणले जाते. जंगलात अनेक भागात सौरपंपांची व्यवस्था आहे. ज्या अडचणीच्या ठिकाणी सौर ऊर्जेची व्यवस्था नाही, अशा भागात असणाऱ्या सिमेंट बशी आणि कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवले जाते.

## सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील लिफ्ट बंद

### रुग्णांच्या जीवितास धोका, संबंधितांविरुद्ध कारवाई करा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती –** येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील (सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल) लिफ्ट सातत्याने बंद असल्यामुळे रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे सांगत बंद लिफ्ट त्वरित दुरुस्ती करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी आझाद समाज पार्टीने पालकमंत्री बावनकुळे यांच्याकडे निवेदनातून केली.अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांसाठी प्रमुख आरोग्य सेवा केंद्र असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची चार मजली इमारत आहे. विविध प्रकारच्या मोठ्या शस्त्रक्रिया व गंभीर आजारांवर येथे उपचार केले जातात. या रुग्णालयात प्रामुख्याने गरीब व




सर्वसामान्य नागरिक उपचार घेण्यासाठी येतात. मात्र गत १० दिवसापासून रुग्णालयातील लिफ्ट पूर्णपणे बंद आहे. कुठल्याही प्रकारची दुरुस्ती संबंधित अधिकाऱ्यांनी केली नाही. आपत्कालीन स्थितीत रुग्णांना त्रास होत असल्याने त्यांच्या जिवितास धोका निर्माण झालानाहे. संबंधित अधिकारी निष्काळजीपणाने दुर्लक्ष कर नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, असे निवेदन मूद करण्यात आले. निवेदन देताना आझाद समाज पार्टी बहराध्यक्ष विपुल चांदे, जिल्हाध्यक्ष सनी चव्हाण यांच्या दाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## महावीर जयंतीनिमित्त गोमातेसाठी छप्पन भोग, पाणपोईचे उद्घाटन

### जेपीपी जैन महिला फाउंडेशन–जैन संस्था युवा मंचच्या वतीने अभिनव उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती–** गोमातेची सेवा करणे हे प्रत्येक हिंदू धर्मीयांचे कर्तव्य आहे, असे सांगत येथील जेपीपी जैन महिला फाउंडेशन व जैन संस्था युवा मंचच्या वतीने गुरुवारी गोमातेला छप्पन भोग अर्पण करण्यात आला. महाराष्ट्रातील या ऐतिहासिक व अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. जैन धर्मगुरू भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम घेण्यात आला.येथील धर्मदाय कॉटन फंड कमिटीमध्ये जैन धर्मीयांनी गौतम प्रसादीचे आयोजन केले होते. त्याचवेळी गोमातेसाठी छप्पन भोगही अर्पण केला. ३१ क्विंटल सामग्रीपासून बनवलेले विविध मिष्टान्न व इतर पदार्थांचा यात समावेश होता. गोमातेसाठीचे हे भोजन जिल्ह्यातील सर्व गोशाळेत पोहोचवले जाणार असल्याचेही सांगण्यात आले. या उपक्रमातून महाराष्ट्रात 'गो वात्सल्य–गो माता सेवे'चा संदेश देण्यात आला. या उपक्रमाचे आ. सुलभा खोडके, आ. रवी राणा, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर मिलिंद चिमोटे, अभिनंदन बँकेचे नवीन चोरडिया आदींनी कौतुक केले आहे. संपूर्ण विश्वाला दया, क्षमा, शांतीचा संदेश देणारे भगवान



महावीर यांची जयंती गुरुवारी भक्तिभावाने साजरी करण्यात आली. जैन धर्मातील परंपरा व संस्कृतीनुसार जेपीपी जैन महिला फाउंडेशन व जैन संस्था युवा मंचच्या वतीने प्रभातफेरी काढण्यात आली होती. भाजीबाजार येथून निघालेली ही फेरी जयस्तंभ चौकात पोहोचल्यानंतर तेथे किर्ती स्तंभाची पूजा करण्यात आली. त्याचवेळी महावीर पाणपोईचे उद्घाटनही करण्यात आले. यावेळी भरत खजांची, विजय बोथरा, रज्जू बुच्चा, अमृत मुठा, संजय मुणोत, संजय चोपडा, डॉ. चंदू सोजतिया, महेंद्र चोपडा, डॉ. नितीन बरडीया, मानक ओस्तवाल, नवीन चोरडिया उपस्थित होते. अमरावती येथील कार्यक्रमानंतर बडनेरा नवी वस्ती येथील भगवान महावीर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमातही आमदार रवी राणा यांनी उपस्थिती दर्शवली. या वेळी भगवान महावीर चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी त्यांनी ५ लाख रुपये अनुदान देण्याची घोषणाही केली. आ. रवी राणा यांच्या या घोषणेचे जैन समाजबांधवांनी स्वागत केले.

# मुलाच्या शिक्षणाचा खर्च उचलण्यासाठी महिला चक्क देहव्यापारात

## पीडित ३५ वर्षीय विवाहित महिला अमरावतीची रहिवाशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर :** महिलेचा पती बेरोजगार आणि दारुडा. घरात सासू-सासरे आणि बारावीत असलेला मुलगा. मुलाला बारावीत शिकवणी वर्ग लावायचे आहेत, परंतु, पैसे नाहीत. घरात शिवणकाम करुन कमावणारी एकमेव महिला. त्यामुळे संसाराचा गाडा हाकताना आर्थिक अडचणींचा डोंगर समोर उभा होता. अशा स्थितीत एका मैत्रिणीकडे हातउसने पैसे मागण्यासाठी गेल्यानंतर तिने लगेच झटपट पैसे कमविण्यासाठी एका आंबटशौकीन मित्राशी शारीरिक संबंध ठेवण्याची ऑफर दिली. पैशांची चणचण लक्षात घेता विवाहित महिलेने होकार दिला. मुलाला बारावीची शिकवणीचा खर्च उचलता यावा म्हणून पुन्हा त्या मैत्रिणीकडे मदत मागायली गेली. मात्र, तिने वारंवार ग्राहकांकडे पाठवत तिला देहव्यापारात ढकलले. बुधवारी सायंकाळी खरबी चौकातील एका अपार्टमेंटमध्ये सुरु असलेल्या सेक्स रॅकेटमध्य ती विवाहित महिला पोलिसांच्या हाती लागली. पोलिसांनी तिला ताब्यात घेतले आणि तिच्याकडून देहव्यापार करणाऱ्या पती-पत्नीला अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ३५ वर्षीय विवाहित महिला अमरावतीची रहिवाशी असून तिला बाराव्या वर्गात शिकणारा मुलगा आहे. पती, वृद्ध सासू आणि सासऱ्यांसह ती राहते. पती दारुडा असून काहीही कामधंदा करीत नाही. ती महिला शिवणकाम करते. मात्र, तेवढ्या पैशात घरखर्च आणि मुलाच्या शिक्षणाचा खर्च झेपत नव्हता. त्यामुळे ती गेल्या वर्षभरापासून आर्थिक अडचणीत होती. ती पूजा ऊर्फ जानव्ही गोविंद भार्गव (३२, रा. फ्लॅट क्र. १०२, विशाखा अपार्टमेंट, खरबी चौक, वाठोडा) हिच्याशी ओळख झाली. महिलेने पूजाला आर्थिक मदत मागितली. तिने काही पैसे तिला दिला. मात्र, ती पैसे परत करु शकली नाही. त्यामुळे पूजाने तिला पैसे परत मागितले. पैसे नसल्याचे सांगताच पूजाने तिला ग्राहकासोबत शारीरिक संबंध ठेवल्यास प्रतिग्राहक २ हजार




रुपये देण्याचे आमिष दाखवले. वाढता कर्जाचा डोंगर बघता महिलेने होकार दिला. पूजा आणि तिचा पती गोविंद या दोघांनी तिला देहव्यापारात ढकलले. तिला नेहमी आंबटशौकीन ग्राहकांकडे पाठवायला लागली.

### पोलिसांच्या छाप्यात अडकली

आरोपी गोविंद आणि पूजा भार्गव हे दाम्पत्यांनी अमरावतीच्या विवाहित महिलेसह अन्य काही तरुणींना देहव्यापारात अडकवले आहे. ते विशाखा अपार्टमेंटच्या दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅटमध्ये आंबटशौकीन ग्राहकांना बोलावत होते. तसेच त्यांच्याकडून देहव्यवसाय करून घ्यायचे. दरम्यान, बुधवारी सामाजिक सुरक्षा पथकाच्या प्रमुख कविता इसारकर यांना पूजा हिच्या घरातून चालणाऱ्या देहव्यवसायाची माहिती मिळाली. त्या आधारावर पोलिसांनी विशाखा अपार्टमेंटमध्ये छापा टाकला. येथे आरोपी दाम्पत्य हे एका महिलेकडून देहव्यवसाय करून घेताना सापडले. या महिलेला ताब्यात घेण्यात आले. कारवाईत पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ३ दुरध्वनी, चार हजारांची रोकड तसेच इतर साहित्य असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल केला. आरोपी पूजा आणि गोविंद यांना वाठोडा पोलिसांच्या ताब्यात दिले.

# दिल्लीत विमान लॅंडिंग होताच पायलटचा मृत्यू, कॉकपिटमध्ये उलट्या,

### लॅंडिंग करताना हृदयविकाराचा झटका; नुकतंच झालं होतं लग्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**
राजधानी दिल्लीत एअर इंडिया एक्सप्रेसच्या एका पायलटचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. श्रीनगर-दिल्ली विमान लॅंडिंग करताच यलट विमानतळावर इतर औपचारिकता पूर्ण करत असताना इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही घटना घडली. विमान कंपनीच्या म्हणण्यानुसार, लॅंडिंगनंतर पायलटला त्रास होऊ लागला आणि काही वेळाने तो बेशुद्ध पडला. पायलटला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

त्या वैमानिकाचे नाव अरमान आहे. अरमान २८ वर्षांचा होता आणि त्याचे नुकतेच लग्न झाले होते. विमान उतरल्यानंतर कॉकपिटमध्ये पायलटला उलट्या झाल्या आणि त्यानंतर




एअरलाइनच्या डिस्पॅच ऑफिसमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाला, असे सहकारी क्रू मेंबर्सनी सांगितले. हृदयविकाराच्या झटक्यामागील नेमके कारण अद्याप कळलेले नसले तरी, कधीकधी विमानात हवेच्या गोंधळामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. पायलटच्या मृतदेहाचा पोस्टमॉर्टम रिपोर्ट आल्यानंतरच हे कळेल.

एअर इंडिया एक्स्प्रेसने, आम्ही पायलटच्या कुटुंबासोबत आहोत

एअर इंडिया एक्स्प्रेसने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, आमच्या सहकाऱ्याच्या निधनाबद्दल आम्ही आमच्या मनापासून शोक व्यक्त करतो. या कठीण काळात आम्ही त्यांच्या कुटुंबासोबत उभे आहोत आणि सर्वतोपरी मदत करत आहोत. आम्ही सर्वांना विनंती करतो की त्यांनी यावेळी आमच्या गोपनीयतेचा आदर करावा आणि कोणत्याही अनावश्यक अटकळ व्यक्त करणे टाळाव्यात.

# जनतेचे जीवन सुकर करण्यासाठी यंत्रणा राबविणार-पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती-**
सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा सुकर पद्धतीने देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. गावागावात शिबीरे, ऑनलाईन सुविधा, अधिकाऱ्यांच्या गाव भेटीने प्रश्न जलदगतीने सुटतील. शासनाच्या अशा विविध प्रयत्नातून जनतेचे जीवनमान सुकर करण्यासाठी यंत्रणा राबविण्यात येत आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

अमरावती उपविभागीय कार्यालयात महसुली वाचनालयाचे उद्घाटन, फ्री होल्ड जमिनीचे प्रमाणपत्र वितरण, शेत वहिवाटीच्या रस्त्यांचे नकाशे वितरण आणि योजनेचा लाभ स्वत:हून सोडलेल्यांचा आज सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार अनिल बोंडे, आमदार रवि राणा, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखेडे, चंदू यावलकर, प्रवीण पोटे-पाटील, विभागीय आयुक्त श्वेता सिंगल, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, शासनाने कामकाजात गतिमानतेचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार अनेक बदल घडवून येत आहे. यात प्रामुख्याने अमरावतीचे विमानतळ येत्या १६ एप्रिलपासून सुरू होणार आहे. त्यासोबतच प्रकल्पग्रस्तांना ८०० कोटी रूपयांचे वाटप, ८०० दिव्यांगांना मदतीचे वाटप होणार आहे. स्वामित्व योजना राबवून



प्रत्येकाला जमिनीची मालकी देण्यात येत आहे. तसेच वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करणे, झुडपी जंगल सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे जमिनी उपलब्ध होणार असून प्रत्येकाला पट्टे देणे शक्य होईल. जीवंत सातबारा मोहिमेतून सातबारावरील मृत व्यक्तींची नावे काढून वारसांची नावे शासन स्वत: नोंदविणार आहे. नागरिकांना शासकीय सोयीसुविधा विनासायास मिळाव्यात यासाठी ऑनलाईन सेवा देण्यात येत आहे. त्यासोबतच ऑनलाईन पद्धतीने समस्या जाणून घेण्यात येत आहे. तसेच नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात वॉर रूम स्थापन करण्यात आली आहे. याठिकाणाहून नागरिकांच्या समस्यांचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. महाराजस्व अभियानातून विहित मुदतीत दाखले देण्याचे काम करण्यात येईल. पांदण रस्त्यांना क्रमांक देण्यात येणार आहे. येत्या काळात सर्व पांदण रस्ते अतिक्रमणमुक्त होतील. यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी रस्ता मिळणार आहे. तसेच पाणी आणि वीज उपलब्ध करून शेतकऱ्यांची पिढी सशक्त करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वसंत सोनार, रूपाली सोनोने, ममता कबीरे, वर्षा भुयार, सुनिता गोमकाळे, बबलू गावंडे, रामभाऊ भोंडे, लक्ष्मीकांत लड्ढा, सुनिलकुमार बुधवानी, अमितकुमार राठी, प्रिया देशमुख, जु. ये. मानकर, गजानन साबळे, आनंद शिंपीकर, सचिन भोंडे, दिनेश क्षिरसागर, सुरेश तेटू, वामनराव दातीर, अंजूम परवीन मोहम्मद इक्बाल, देवेंद्र खंडारे, फिरोजाबी नियामत खान, शाहरूख अहेमद शेख नझिर, शिला शिंदे, गणेश वाघ, विश्वनाथ नामुर्ते, गुणवंत तायडे आदींचा सत्कार करण्यात आले.

### जिल्हाधिकारी कार्यालयातील वॉर रूमचे उद्घाटन

शासनाच्या १० दिवसांच्या कृति कार्यक्रमांमतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात वॉर रूम आणि हॅलो कलेक्टर संवाद उपक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वॉररूमच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाकडे नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचे ऑनलाईन निराकरण करण्यात येणार आहे.नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हास्तरावर चांगला उपक्रम राबविण्यात येत आहे. यामुळे नागरिकांना निश्चितच फायदा होणार आहे. हा उपक्रम निरंतर सुरू राहण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना संपूर्ण मदत देण्यात यावी. नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक झाल्या हा उपक्रम यशस्वी ठरेल. अमरावती येथील हा उपक्रम यशस्वी झाल्यास या उपक्रमाची व्याप्ती राज्यभर करण्यात येईल, अशी घोषणा पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी केली आहे,जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिक विविध विभागाच्या तक्रारी आणि निवेदने सादर करतात. याचा पाठपुरावा गतीने होण्यासाठी ऑनलाईन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांना संपर्क क्रमांक, क्यूआर कोड आणि ऑनलाईन तक्रार करण्यासाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आला आहे. नागरिकांच्या तक्रारी आल्यानंतर त्या ऑनलाईन पद्धतीने संबंधित विभागाला पाठविण्यात येतील. विहित मुदतीत या तक्रारी निकाली काढण्यासाठी कक्षातर्फे पाठपुरावा करण्यात येईल. तसेच नागरिकांना त्यांच्या तक्रारीची स्थिती पाहण्यासाठी ऑनलाईन सुविधा, तसेच ई-मेलद्वारे माहिती देण्यात येणार आहे.तक्रारीचे निरसन झाल्यानंतर नागरिकांना याबाबत अभिप्राय नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. योग्य पद्धतीने तक्रारीचे झाले नसल्यास ती तक्रार पुन्हा विचारात घेतील जाणार आहे. या पद्धतीमुळे नागरिकांच्या समस्यांची घरबसल्या सोडवणूक शक्य होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी यावेळी दिली.

# आंबेडकर जयंतीच्या दिवशी नक्षलवाद्यांनी उघडपणे माफी मागावी

## जनसंघर्ष समितीची मागणी : केंद्रीय गृहमंत्र्यांना लिहीले पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नागपूर :** गृहमंत्री अमित शाह यांच्या आवाहनानंतर नक्षलवादी संघटनांनी शांतता चर्चेसाठी तयारी दाखविली आहे. मात्र या संघटनांशी काही अटींवरच चर्चा करावी अशी भूमिका नक्षलवादी क्षेत्रात काम करणाऱ्या जनसंघर्ष समितीने घेतली आहे. १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी नक्षलवाद्यांनी उघडपणे माफी मागावी तसेच शहरांतील व्हाईट कॉलर सहकाऱ्यांची नावे जाहीर करावीत अशी मागणी समितीतर्फे करण्यात आली आहे. याबाबत त्यांनी गृहमंत्री शाह यांना पत्रदेखील पाठविले आहे.

नक्षलवाद्यांनी आतापर्यंत हजारो निष्पाप आदिवासी व नागरिकांना क्रूरपणे मारले आहे. त्यांनी सरकारसमोर शांतता चर्चेची विनंती केली आहे ही चांगली बाब आहे. मात्र त्याअगोदर काही अटींचे त्यांना पालन करायला लावणे अनिवार्य आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त, सीपीआय (माओवादी) पक्षाच्या भूमिगत नेत्यांनी उघडपणे समोर येऊन हजारो निष्पाप आदिवासी आणि दलितांच्या हत्येबद्दल जाहीरपणे माफी मागावी. तसेच भारतीय संविधानावर पूर्ण विश्वास असल्याचे त्यांनी जाहीर करावे. माओवादी चळवळीतील नेते मुख्य प्रवाहातील संवैधानिक प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक आहे हे त्यांनी जनतेला सांगावे. त्यांनी सीपीआय (माओवादी) पक्ष विसर्जित करावा व सर्व शस्त्रे तसेच दारुगोळा पोलिसांच्या हवाली करावा. माओवादी पक्षाच्या सरचिटणीसांपासून ते पीएलजीएच्या शेवटच्या नक्षलवाद्यापर्यंत सर्वांनीच सुरक्षा दलांसमोर आत्मसमर्पण करावे अशी अट टाकण्यात यावी. तसेच माओवाद्यांनी त्यांच्या शहरी आघाडीच्या संघटना आणि कार्यकर्त्यांची नावे उघडपणे



जाहीर करावीत. त्यांच्याशी निगडीत शहरी संघटना बरखास्त कराव्या ही महत्त्वाची अट त्यांच्यासमोर टाकायला हवी, अशी पत्रातून जनसंघर्ष समितीने गृहमंत्र्यांकडे मागणी केल्याची माहिती अध्यक्ष दत्ता शिर्के यांनी दिली आहे.

# वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी एआय तंत्रज्ञानाची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११सोलापूर :** ढरपूर महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. तसेच आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला लाखो भाविक पंढरीत येतात. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र , भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग , प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात वारकरी- भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली.वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची चाचणी पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते.श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात.

# महारुद्र हनुमान जन्मोत्सवानिमित्तअयोध्येसारखे सजले जहागीरपूर

## श्रीरामनवमीपासून मंदिरात श्रीराम चरितमानसचे अखंड पठण सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११जहागीरपूर-** हनुमान जयंती निमित्त विश्वविख्यात श्री महारुद्र मारुतीचे शक्तीस्थळ तथा श्रद्धास्थान असलेल्या जहागीरपूरमधील महारुद्र मारुतीच्या दर्शनासाठी भाविकांचा जनसागर उसळणार आहे. भाविकांच्या सोयीसाठी जहागीरपूर अयोध्येसारखे सजले आहे.

सोमवार, ७ एप्रिल ते शुक्रवार ११ एप्रिलपर्यंत अखंड रामचरित मानसचे पठण वाचक पं. शत्रुघ्न पांडे व त्यांच्या पाच सहकाऱ्यांद्वारे मंदिरात होत आहे. चैत्र शुक्रवार ११ एप्रिलला सकाळी ११.३० पासून १२ एप्रिलला पहाटे ४ पर्यंत मंदिरात श्री महालघू रुद्राभिषेक पं. शत्रुघ्न पांडे व ११ सहकाऱ्यांद्वारे होणार आहे. पहाटे ४ ते ५.३० पर्यंत उपस्थित हजारो स्त्री पुरुष भाविकांद्वारे सामूहिक हनुमान चालीसा पाठ, भजन, कीर्तन मंदिरात होईल. पहाटे ५.३० वाजता महारुद्र हनुमान जन्मोत्सवाची महाआरती होऊन प्रसाद वितरण होईल. सकाळी १० पासून दुपारी ४ पर्यंत भक्त निवासात महाप्रसाद वितरणाचा कार्यक्रम होणार आहे.

श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त शनिवार, १२ एप्रिलला सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत शेकडो भाविकांद्वारे सामूहिक हनुमान चालीसा महायज्ञ केला जाणार असून, महारुद्र मारुती भक्त परिवारातर्फे भक्त निवासात याचे आयोजन केले आहे.

रविवारी दुपारी १ पासून पं. कैलास महाराज लोखंडे रा. आर्वी व त्यांच्या सहकाऱ्यांद्वारे काल्याचे कीर्तन होईल. सायंकाळी ५ वाजता दहीहंडीचा कार्यक्रम, सायंकाळी ६ पासून भक्त निवासात महाप्रसाद वितरण होईल. मंगळवार, १४ एप्रिलला दिवसभर चैत्र यात्रा तसेच स. ११ ते दु. २ पर्यंत भक्त निवासात महाप्रसाद. नंतर रात्री ८ वा.पासून तरुण रामायण मंडळ, पुलगाव तर्फे कैलास शर्मा व मित्र मंडळी संगीतमय सुमधूर सुंदरकांड सादर करतील. शनिवार १९ एप्रिलला दिवसभर चैत्र यात्रेचे आयोजन केले असून, स. ११ ते दु. २ पर्यंत भक्त निवासात महाप्रसाद व रात्री ८ ते ११ पर्यंत धामणगाव रेल्वे महारुद्र मित्र परिवार तर्फे सुमधूर सुंदरकांड सादर केले जाणार आहे. चैत्र शनिवार २६ एप्रिलला दिवसभर चैत्र यात्रा, सकाळी ११ ते दु. २ पर्यंत रामलल्ला रामायण मंडळ, पुलगाव रेल्वेतर्फे अनिल पनिकर व त्यांचे सहकारी संगीतमय



सुंदरकांड मंदिरात सादर करतील. २०२५ या वर्षी जहागीरपूर येथे ५ लाख भाविक महाप्रसाद ग्रहण करणार असल्याचा संस्थानाचा अंदाज असून, यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. सध्या दर मंगळवारी व शनिवारी भाविकांना महाप्रसादात मिठाई वितरित केली जात असून महाप्रसाद वितरणाचे हे सलग १४ वे वर्ष आहे. भाविकही येथे त्यांच्या वाढदिवसासह लग्नाचा वाढदिवस, स्मृती दिनानिमित्त दान व सहकार्य करत असतात. जहागीरपूरला शासनाद्वारे ब वर्ग तीर्थक्षेत्र देण्यात आला असून यंदाच्या उत्सवासाठी ५ कोटींचा विकास निधीही मंजूर केला आहे.

**एसटी महामंडळाची व्यवस्था** :हनुमान जयंती व चैत्र शनिवारनिमित्त जहागीरपूरला येण्यासाठी विविध बस स्थानकावरून भाविकांच्या संख्येनुसार यात्रा स्पेशल बस भाविकांच्या विनंतीनुसार सोडण्यात येणार आहेत. एसटी बसमध्ये महाराष्ट्र शासनाने ७५ वर्षे वय असलेल्या सर्व स्त्री पुरुषांसाठी मोफत प्रवास दिलेला आहे. ६५ वर्षे वय असलेल्या पुरुषांना ५० टक्के भाडे आकारले जात आहे. तसेच सर्व महिलांना ५० टक्के तिकीट मोफत केले आहे. या संधीचा लाभ भाविक घेणार आहे. श्री क्षेत्र जहागीरपूरला येण्या जाण्यासाठी शनिवारी मोफत बस व इतर वाहनांची व्यवस्था अमरावती येथील श्री दत्त कृषी मंदिर, जुने कॉटन मार्केट समोरून गोपाल सोनी यांच्या मार्गदर्शनात एकता मिनी बस असोसिएशन व पृथ्वी ट्रॅव्हल्सद्वारे केली आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# निम्नपेढी सिंचन प्रकल्पातील खुले भूखंड धारक प्रकल्पग्रस्तांचे पालकमंत्री बावनकुळे यांना निवेदन

## दहा वर्षापासून भूखंडा पासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पातील अळणगांव या बाधित गावातील आम्ही प्रकल्पग्रस्त आहोत. अळणगांव या गावाचे पुनर्वसन मौजा कठोरा येथे होत असून प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदा १९९९ अन्वये सन २०१५ ते २०१७ यादरम्यान भूखंड वाटप करण्यात आले आहे.संयुक्त मोजणी अहवालानुसार आम्ही सुद्धा अळणगांव या गावचे पिढ्यानपिढ्या रहिवासी असून कायद्यानुसार प्रकल्पग्रस्त आहोत, परंतु आम्ही भूखंड मिळण्यास पात्र असताना सुद्धा केवळ आमच्या मालकीचे खुले भूखंड असल्याची बाब समोर करून आम्हास नवीन गावठाणांत भूखंड देण्यात आले नाही. परंतु अळणगांवातील किमान २५ खुल्या भूखंड धारकांना नवीन गावठाणांत भूखंड दिले आहेत सदर २५



खुले भूखंड धारकांना नियमानुसारच भूखंड वाटप करण्यात आले आहे असे असताना आम्हाला मात्र खुले भूखंड धारक आहात या सबबी खाली भूखंड नाकारण्यात आले आहे. ही बाब उघडपणे आमच्यावर अन्याय करणारी असून विसंगत आहे.

ज्या नियमाच्या आधारे उपरोक्त नमूद २५ खुल्या भूखंड धारकांना नवीन वसाहतीत भूखंड देण्यात आले त्याच नियमानुसार आम्हाला सुद्धा भूखंड देण्यात यावे जेणेकरून आम्ही अशा भूखंडात घर बांधून, संसार स्थापन करु शकु.अश्या मागणीचे निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्शेखर बावनकुळे यांना देण्यात आले.

आपण या या प्रकरणाची सखोल चौकशी करून झालेल्या अन्यायाचे निराकरण करावे. आम्हास न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन उदाहरणार्थ आत्मक्लेष, प्राणांतिक उपोषण, आणि शेवटी नाईलाजास्तव आत्मदहनाचा टोकाचा मार्ग पत्करावा लागेल, तेव्हा आपण आम्हास प्रकल्पग्रस्तास देह त्यागाची अनुमती प्रदान करावी.आपण अनुमती न दिल्यास प्रशासनाची या प्रकारास अनुमती आहे असे गृहीत धरून देह त्याग करण्यास बाध्य होऊन या आमच्या देहत्यागाच्या निर्णयामुळे होणाऱ्या शारीरिक, आर्थिक,मानसिक नुकसानास सर्वस्वी शासन प्रशासन जबाबदार असेल याची कृपा नोंद घ्यावी.असे निवेदनात मागणी केली आहे.

धनराज खर्चान सचिन मेटांगे श्रीकांत मेटांगे ,विठ्ठल खर्चान रामदास खर्चान, विठ्ठल पोहने, दीपक दुर्गे, स्वप्निल वानखडे, रामेश्वर तलवारेही ती नऊ नावे आहेत की यांचे अळणगाव येथे खुले भूखंड आहेतत्यांचा त्या खुल्या भूखंडाचा त्यांना मोबदला सुद्धा मिळालेला आहे संयुक्त मोजणी अहवाल जे एम आर यादीत सुद्धा यांचे नावे आहेततरी मागील दहा वर्षापासून यांना भूखंडापासून वंचित आहे.

# नवनीत राणांचा हनुमान चालीसा सामूहिक पठण कार्यक्रमात सहभाग



हिंदु शेरणी श्री हनुमान भक्त माजी खा सौ नवनीत रवि राणा यांनी संकटमोचन श्री हनुमान मंदिर रविनगर येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री हनुमान जन्मोत्सव निमित्त सलग ११ वेळा श्री हनुमान चालीसा पठण केली. अमरावती शहरातील रविनगर येथील हनुमान मंदिरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात हनुमान जयंती उत्सव साजरा करण्यात येतो.गुरुवारी सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमात त्या सहभागी झाल्या होत्या.

# चिखलदऱ्यात ब्रिटिशकालीन कॉफीच्या मळ्याला आग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११चिखलदरा :**

अप्पर प्लेटोतील ब्रे साईड परिसरातील ब्रिटिशकालीन कॉफी मळ्याला बुधवारी रात्री आग लागली. जवळपास दोन हेक्टरवरील कॉफी झाडे जळून राख झाली. वनअधिकारी व नागरिकांच्या लक्षात येताच अग्निशमन दल व स्थानिक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. इंग्रजांनी चिखलदरा पर्यटनस्थळाचा शोध लावून येथे कॉफीचे मळे लावले होते. या मळ्याला बुधवारी रात्री लागलेली आग लागल्याने कॉफीची हजारो झाडे करपली असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते अरुण तायडे, शेख अन्सार उपवनसंरक्षक यशवंत बहाले यांच्या सतर्कतेने रात्री १ च्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

# महापालिकेच्या शिक्षिकेचे पुस्तक 'पीएमश्री'मध्ये

## वैशाली परतेकी यांचे यश : शाहू महाराजांचे जीवनचरित्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अंतर्गत राज्यस्तरीय 'पीएमश्री' मध्ये महापालिकेच्या शिक्षिका वैशाली परतेकी यांच्या पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनचरित्रावर त्यांनी लिहिलेले पुस्तक चार भाषांतील माध्यमातील प्राथमिक वर्षांच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात राहणार आहे. महापालिका शिक्षण विभागाच्या शिरपेचात याव्दारे मानाचा तुरा खोवल्या गेला आहे.अमरावती महापालिकेच्या मनपा मराठी मुलीचे हायस्कूल, बुधवारा या शाळेतील सहायक शिक्षिका वैशाली हिरासिंग परतेकी यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनचरित्रावर अभ्यासपूर्ण लिखाण करीत पुस्तकाचे संपादन केले आहे शाहू महाराजांच्या जन्मापासून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याचा उलगडा विस्तृत व सोप्या सहज भाषेत त्यांनी या पुस्तकातून मांडला आहे. यापुस्तकाची दखल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने घेतली.

राज्यस्तरीय पीएमश्री अंतर्गत स्तर एक ते तीन व चार ते पाचसाठी तयार करण्यात आलेल्या मराठी, उर्दू, हिंदी व इंग्रजी या चारही माध्यमांसाठी ११२ पुस्तकांचा प्रकाशन र सोहळा नुकताच पार पडला. त्यामध्ये वैशाली परतेकी यांच्या राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनचरित्रावरील पुस्तकाचा समावेश आहे. महापालिका स्तरावरील शिक्षिकेच्या पुस्तकाची निवड 'पीएमश्री'मध्ये व्हावी, ही मराठी मुलीचे हायस्कूल व मनपा शिक्षण विभागासाठी अभिमानाची बाब ठरण्यासोबतच शिरपेचात मानाचा तुरा खोवल्या गेला आहे.मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, मुख्याध्यापिका वैशाली कुन्हेकर, राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू, प्रवीण पाटील व शाळेतील सर्व शिक्षकांनी वैशाली परतेकी यांचे अभिनंदन केले आहे.

# सिंचन विहिरींच्या मंजुरीसाठी, वर्क ऑर्डर मिळवण्यासाठी लागतो ६ महिन्यांचा वेळ

## नांदगाव पंचायत समितीच्या प्रशासनाकडून चालढकल; लाभार्थीमधून नाराजीचा सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नां.खंडेश्वर**

तालुक्यातील पळसमंडळ ग्रामपंचायतीने सहा महिन्यांपूर्वीच ग्रामसभेची मान्यता घेऊन सिंचन विहिरींचे परिपूर्ण प्रस्ताव पंचायत समितीमध्ये पाठवले. परंतु त्या प्रस्तावांना अद्यापही मंजुरी देण्यात आली नाही. पंचायत समिती कार्यालयाचा कारभार चालवणाऱ्या संबंधित विभागांमध्ये चालढकल सुरू असल्याने हा विलंब झाल्याची संबंधित लाभार्थ्यांची माहिती आहे. त्यामुळे दोषींवर कारवाई करून न्याय मिळवून द्यावा,




अशी मागणी होत आहे.

दुसरीकडे ६०-४० हे प्रमाण राखले जावे म्हणून लाभार्थ्यांना जलतारा या दुसऱ्या योजनेत समाविष्ट होण्यासाठी प्रशासन दबाव टाकत असल्याचाही शेतकऱ्यांचा आरोप आहे. जलतारा कामाची मंजुरी होईपर्यंत इतर कोणत्याही कामांचे हजेरीपत्रकच काढू नये, असे पंचायत समिती प्रशासनाचे आदेश आहेत, असे अधिकारी सांगतात. त्यामुळे विहिरींच्या बांधकामांना परवानगी देण्यात आणखी विलंब होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. - काही शेतकरी ही योजना स्वीकारायलाही तयार आहेत, परंतु त्यांचे प्रस्तावही याच विभागात पडून आहेत. एकंदरीत हा विभाग शेतकऱ्यांप्रती सकारात्मक नाही, असाच अनेकांचा अनुभव आहे. त्यामुळे जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जावी, अशी मागणी पुढे आली आहे.

पंचायत समिती प्रशासनाने जलताराच्या कामांना मंजुरी दिली नाही आणि सिंचन विहिरीच्या बांधकामाचीही वर्क ऑर्डर दिली नाही. त्यामुळे या तालुक्यात सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या उन्हाळा सुरू आहे. दोन महिन्यानंतर लगेच पावसाळा सुरू होईल. त्यामुळे विहिरींचे खोदकाम व बांधकाम कसे होईल, पुढे त्याचे पैसे लवकर मिळतील की नाही, असे अनेक प्रश्न निर्माण झाल्याने झांबंधित लाभार्थी संभ्रमात सापडले आहे. त्यामुळेच विहिरींचे खोदकाम वेळेत होऊन मजुरांचे हजेरीपत्रक मंजूर करण्याच्या मुद्द्याकडे गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी लक्ष पुरवावे, अशी मागणी पुढे आली आहे.

### निधी लवकरच

जलतारा योजनेच्या कामावर सध्या राज्यभर जोर दिला जात आहे. नांदगाव पंचायत समितीनेही उद्दिष्ट पूर्णत्वास नेले आहे. त्यामुळे आता लगेच विहिरींच्या कामांकडे लक्ष दिले जाणार असून, मंजूर प्रस्तावांचा निधी टप्याटप्याने दिला जाणार आहे.

**संजय झंझाड, सहायक गटविकास अधिकारी, नांदगाव खंडेश्वर,**

# मार्डी येथे अखंड वार्षिक उत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मार्डी**

श्री हनुमान जयंती उत्सवाच्या पर्वावर श्री संगीतमय रामकथा व हरि कीर्तन सप्ताहाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाची रामनवमीला सुरुवात झाली. तीर्थ स्थापना सकाळी १० वाजता संजय वानखडे - (माडर्डीकर) यांच्या हस्ते झाली. - यावेळी पौरोहित्य निलेश महाराज जोशी (मार्डी) यांनी केले. गुरुवर्य जगद्गुरु रामानंदचार्य स्वामी श्री रामराजेश्वराचार्य (समर्थ माऊली सरकार) श्री रूक्मिणी पीठाधीश्वर, अंबिकापूर (कौंडण्यपूर) यांच्या प्रेरणेने ५ ते १२ एप्रिलपर्यंत धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत.



याअंतर्गत पहाटे ५ ते ६ वाजता काकडा आरती, संध्याकाळी ६ ते ७वाजता हरिपाठ, सकाळी ९ ते ११ वाजता व दुपारी ४ ते संध्याकाळी ६ पर्यंत रामकथा, रात्री ८ ते १० हरि कीर्तनाचे आयोजन केले आहे. संगीतमय रामकथा प्रक्क्ते श्रीहरी महाराज गावंडे (दर्यापूर) यांच्या वाणीतून तर हरि कीर्तन दररोज रात्री ८ ते १० पर्यंत होणार आहे. ११ एप्रिलला दिंडी सोहळा सकाळी ६ वाजता होणार असून वारकरी भजनी मंडळ व महिला भजनी मंडळ मार्डी यात सहभागी होतील. तसेच १२ एप्रिलला हनुमान जयंती निमित्त पहाटे ५ वाजता महाअभिषेक आरती होईल. नंतर सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत काल्याचे कीर्तन श्रीहरी महाराज गावंडे हे करतील.

# नागपूर 'एम्स'मध्ये शवविच्छेदन अहवाल झाले की नाही? कळणार क्षणात.., देशातील पहिलाच प्रयोग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ नागपूर**

नागपुरातील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) शवविच्छेदनाचा अहवाल तयार झाला की नाही हे आता पोर्टलद्वारे एका 'क्लिक'वर कळत आहे. देशातील या पहिल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी एम्सला 'कॉपीराईट'ही मिळाले आहे.



एम्स रुग्णालयात विदर्भासह मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलांगणा राज्यातील अत्यवस्थ रुग्ण उपचाराला येतात. पोलीस नोंद असलेले, अपघाताचे रुग्ण, अनोळखी व्यक्ती, संशयास्पद मृत्यू असलेल्यांचे शवविच्छेदन केले जाते. शवविच्छेदन अहवाल एम्सच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागाकडून केवळ पोलिसांना उपलब्ध केले जातात.न्यायालयीन प्रक्रियेसाठी हे अहवाल खूपच महत्त्वाचे असतात. यापूर्वी एम्समध्ये पोलिसांसह नातेवाईकांना शवविच्छेदन अहवालासाठी पायपीट करावी लागायची. हे अहवाल तयार झाले की नाही? हेही संबंधित रुग्णालयात गेल्यावरच कळायचे. हा त्रास टाळण्यासाठी एम्सच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मनीष श्रीगिरीवार यांनी पोर्टलवर काम सुरू केले. त्यानुसार अखेर पोर्टल कार्यान्वित झाले आहे. या पद्धतीची यंत्रणा असलेले नागपूर एम्स हे देशातील पहिले रुग्णालय ठरले आहे. यासाठी ३ एप्रिलला 'कॉपीराईट'ही मिळाले.

# दरोड्यातील फरार दोन आरोपींना ठोकल्या बेड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

कोतवाली ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार दोन आरोपीना गुन्हेशाखेच्या युनिट एकने मंगळवारी ८ व बुधवारी ९ एप्रिलला अटक केली. या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली होती. त्यानेच कट रचून हा गुन्हा घडवून आणल्याचे तरासात समोर आले होते. साकिब शहा तौफिक रहा (२२) अझ खान नूर खान (१९) दोघेही रा. कबीरनगर, अमरावती अशी अटक केलेल्या आरोपीची नावे आहेत, तर कुणाल राजकुमार बत्रा (२२) च. कवरनगर परिसर, अमरावती असे अटकेत असलेल्या मुख्य सूत्रधाराचे नाव आहे. राजकमल चौकातील एका मोबाइल विक्रीच्या दुकानात काम करणारा मंगेश वासुदेव काले (२६) रा. प्रतननगर, अमरावती हा २७ मार्च रोजी सायंकाळी २ लाख ५५ हजार १२० रुपयांची रोकड बॅगमध्ये घेऊन दुचाकीने जात होला मार्गात जयस्तंभ चौक परिसरातील एका चित्रपटगृहासमोर दुचाकीवरून आलेल्या लुटारूंनी त्याच्याजवळील रोकड असलेली बैग हिसकावून पळ काढला.

याप्रकरणी तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. गुन्हेशाखेचे युनिट एक ही गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते. घटनेनंतर २४ तासांच्या आत गुन्हे शाखेच्या युनिट एकने एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून गुन्ह्यात आणला होता परंतु गुन्ह्यातील इतर आरोपी छोटू उर्फ सोहेल शाह शफीक शाह, अझशद खान नूर खान दोघेही रा. कबीरनगर, रिझवान व व्हेमतनगर कैजान मिल्ला फिरोज खान व दादू वल्द नसीम रा. साजीयानगर, अमरावती हे फरार होते.

# शाळांना जाहिराती अपलोड करण्यासाठी १५ एप्रिलची मुदत

## पवित्र पोर्टल : पाचव्यांदा दिली अनुदानित शाळांना मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पवित्र पोर्टलवर सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांना रिक्त पदांच्या जाहिराती अपलोड करण्यासाठी १५ एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे प्राधान्यक्रम भरण्याची सुविधा एप्रिल अखेरीस उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

राज्यात पहिला टप्पा ७० टक्के शिक्षक भरती पूर्ण झाली असून उर्वरित १० टक्के जागेवर दुसऱ्या टप्प्यात शिक्षकांची भरती होणार असून त्याप्रमाणे नियोजन केले गेलेले आहे, त्यासाठी १५ एप्रिल पर्यंत मुदत वाढ दिली गेली आहे. पहिल्या टप्यात टप्यात २१,६७८रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानंतर दुसरा टप्यात रिक्त, गैरहजर, अपात्र गैरहजर उमेदवारांमुळे उर्वरित जागांसाठी शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा सुरु होईल.



यासाठी यासाठी २० जानेवारीपासून स्थानिक स्वराज संस्था खासगी संस्थांना रिक्त पदांच्या जाहिराती अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**आता जागा वाढण्याची शक्यता**

पवित्र पोर्टलवर जाहिराती अपलोड करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. सुरुवातीला २० फेब्रुवारी, त्यानंतर २८ फेब्रुवारी, १५ मार्च, ३१ मार्च आणि आता १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आणखी जाहिराती अपलोड होतील.

# सेवाव्रती बापूसाहेब देशमुख पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय सामाजिक पुरस्काराने सन्मानीत

## तेलंगणाचे राज्यपाल महामहिम जिष्णुजी देव वर्मा यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर धर्मपीठ संस्थेच्या वतीने दिल्या जाणारा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा मुंबई येथील नरिमन पॉईंट स्थित यशवंतराव चव्हाण सभागृहात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पडला.



यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय सामाजिक पुरस्कार श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष तथा प्रमुख विश्वस्त गाडगे महाराज ट्रस्ट संस्था, तसेच नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार सेवाव्रती बापूसाहेब देशमुख यांना तेलंगणाचे राज्यपाल महामहिम श्री.जिष्णूजी देव वर्मा यांच्या शुभ हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज व महाराष्ट्र विधान परिषद सभापती श्री.रामजी शिंदे, मा.डॉ.मुरहरी केळे ज्येष्ठ साहित्यक तथा अध्यक्ष त्रिपुरा राज्य विद्युत मंडळ, मा.श्री.आसिफ भामला अध्यक्ष-भामला फाउंडेशन मुंबई आदी मान्यवर या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्याला विशेष उपस्थित होते. यावर्षीचा हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय सामाजिक पुरस्कार निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या सेवाकार्याचा वसा व वारसा व्यापकपणे पुढे नेणारे सेवाप्रती बापूसाहेब देशमुख यांना प्रदान करून त्यांचा सेवाकार्याचा गौरव यावेळी करण्यात आला. प्रामुख्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हे नाव भारताच्या इतिहासात अत्यंत सन्मानाने घेतले जाते. अहिल्याबाई होळकर या इंदूर संस्थानाच्या शासिका होत्या आणि त्या आपल्या न्यायप्रियता, दानशीलता व धर्मभावनेमुळे प्रसिद्ध होत्या.त्यांनी अनेक धार्मिक स्थळांचे पुनरुत्थान केले, घाट, मंदिरे बांधली, आणि गरीब-गरजूंना मदत केली. त्यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने जोपासत पुण्यश्लोक अहिल्यादेवी धर्मपीठ संस्थेच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी दरवर्षी या राष्ट्रीय पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी धर्मपीठ संस्थेचे अध्यक्ष श्री.सागर धापटे पाटील, दानशूर श्रीमती सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला, सारिका झुनझुनवाला,व्यवस्थापक श्री.एकनाथ ठाकूर, श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे संचालक श्री. सागरभाऊ देशमुख, श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्टचे व्यवस्थापक तथा कर्करोग रुग्णसेवक श्री.प्रशांतभाऊ देशमुख, व्यवस्थापक श्री.वसंतराव देशमुख, संचालक तथा व्यवस्थापक श्री.कुणालभाऊ देशमुख, व्यवस्थापक श्री.प्रकाशभाऊ महात्मे, व्यवस्थापक श्री.अमोल ठाकूर समाजसेवी श्री.गजानन जवंजाळ आदींसह नागरवाडी,मूर्तिजापूर,अमरावती, येथील श्री बाबांची भक्त मंडळी यावेळी उपस्थित होती.

## क्रांतिसूर्य,थोर समाजसुधारक,महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन !!!



**स्त्रीशिक्षणाचे अग्रदूत,बहुजन, शेतकरी आणि कष्टकरी समाजाला शिक्षणाची दारे खुली करून देणारे क्रांतिसूर्य,थोर समाजसुधारक,महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अमरावती शहरातील (चित्रा चौक) येथील महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यास अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तर अमरावती शहर भाजपाच्या वतीने मजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.**

# निकृष्ट दर्जाच्या कामाची पोलखोल केल्यामुळे अंकुश घारड यांच्यावर हल्ला

## ठेकेदाराचा मनमानी कारभार ; कोट्यावधी रुपयांच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मोर्शी**

मोर्शी नगर परिषद क्षेत्रामध्ये राज्य शासनाने मोर्शी शहर विकासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत मोर्शी नगर परिषदेला रस्ते बांधकामासाठी कोटयावधी रुपयांचा निधी मंजूर केला त्यामध्ये प्रभाग क्र. ९ मधील अमरावती अप्रोच रोड ( परशुराम मंगल कार्यालय) ते सुधाकर माकोडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजूस गटारीचे काम करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामाकरीता ४ कोटी ५२ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले होते मात्र, नगर परिषदेमार्फत करण्यात येत असलेले काम हे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत अंकुश घारड यांनी सादर कामाची तक्रार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी यांच्याकडे २६ मार्च रोजी दाखल केलेली होती. त्या तक्रारीवर प्रशासनाकडून अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. संबंधित ठेकेदाराने दिनांक १० एप्रिल रोजी सदर रस्त्याचे काम सुरू



केले असता संबंधीत ठेकेदाराचा सुपर सुपरवायझर शाहिद शेख याने अंकुश घारड यांना आमच्या कामाची तक्रार का केली म्हणून अंकुश घारड यांच्यावर हल्ला करून मारहाण व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे अंकुश घारड यांनी पोलिस स्टेशन मोर्शी येथे रिपोर्ट दिला असता सुपरवायझर शाहिद शेख यांच्या विरुद्ध ११५ (२), ३५२, ३५१(२), ३५१(३), अन्वये मोर्शी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कॉलनी परिसरातील कामाची सुरुवात मागील चार महिन्यापासून केली असून संपूर्ण रस्ता हा खोदून ठेवलेला आहे कॉलनी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना शाळेतील विद्यार्थ्यांना येणे जाण्याकरिता मोठ्यात प्रमाणात त्रास होत असून खोदलेल्या रस्त्यावर मोठा अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराने तात्काळ काम सुरू सुरू करून निकृष्ट दर्जाच्या केलेल्या कामावर कारवाई करण्याची मागणी आम्ही प्रशासनाकडे केली होती तरीही नगर परिषद प्रशासन संबंधित ठेकेदाराला पाठीशी घालत असल्यामुळे संबंधित ठेकेदार आमच्यावर हल्ला करून आमचा जीव घेण्यासाठी ही मागे पढे पाहत नसेल तर यांच्यावर प्रशासनातर्फे उच्चस्तरीय चौकशी करून आम्हाला न्याय मिळाल्या शिवाय मी स्वस्त बसणार नाही.

# उत्पन्नासह रहिवासी पुरावा द्या; नसल्यास रेशन कार्ड होणार रद्द

## जिल्ह्यात पात्र शिधापत्रिकांची शोधमोहीम सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शासकीय स्वस्त धान्याचा लाभघेणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत रेशन कार्डधारकांच्या वार्षिक उत्पन्नासह रहिवासी पुराव्याची पडताळणी होणार आहे. हा पुरावा नसल्यास रेशन कार्ड रद्द होणार आहे. खोची माहिती दिल्यास संबंधितांवर कारवाई सुद्धा केली जाणार आहे.

या मोहिमेंतर्गत ज्यांचे उत्पन्न अधिक आहे अथवा ज्यांना ज्या पत्त्यावर शिधापत्रिका देण्यात आली आहे, ते त्या पत्त्यावर राहत नाहीत, अशा लाभार्थ्यांचा शोध या माध्यमातून घेतला जाणार आहे.

विशेष म्हणजे, काही ठिकाणी लाभार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे, तरीहीत्यांच्या नावाने धान्य उचलले जाते. अशा मृत लाभार्थ्यांची नावेही या मोहिमेतवगळली जाणार आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांकडून आता पुरवठा विभाग एकफॉर्म भरून घेणार आहे. यामध्ये अ आणि ब अशी वर्गवारी करून या आलेल्याअर्जाची छाननी केली जाणार आहे. यामध्ये त्रुटी अथवा चुकीची माहिती



आढळून आल्यास त्यांची शिधापत्रिका रद्द केली जाणार आहे.लाभार्थ्यांनी चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला काढून ठेवावा. तपासणीदरम्यान, चुकीची माहिती असल्यास रेशन कार्ड रद्द होणार आहे.जे रेशन कार्डधारक धान्याची उचल करतात. ते कार्डधारक संबंधित पत्त्यावर राहतात की नाही, याचीही तपासणी होणार आहे

**जिल्ह्यात पडताळणी मोहीम सुरू**

गरीब तसेच गरजूंना अन्नधान्याची गरज असते. मात्र, काही नागरिक आर्थिक सक्षम असतानाही रेशनचे धान्य घेताततत्यामुळे आता शासनाने पडताळणी सुरू केली आहे. यामुळे ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे, अशांना आपला रेशनवरील अधिकार सोडावा लागणार आहे. या मोहिमेमध्ये उत्पन्न तसेच रहिवासी दाखलाही तपासला जाणार आहे. यासाठी कर्मचारी थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचणार आहे.

**तर योजनेतून लाभार्थ्यांना वगळले जाणार**

पुरवठा विभागाने आता अन्न सुरक्षा अथवा अंत्योदय योजनेत धान्य उचलत असणाऱ्या लाभार्थ्यांनी स्वत:हून लेखी फॉर्म भरून देण्याचे आवाहन केले आहे. आलेले फॉर्म स्वस्त धान्य दुकानदार खात्री करून पुरवठा विभागाला कळविणार आहे. त्यानंतर पुरवठा विभागाच्या वतीने त्याची पडताळणी केली जाणार आहे. यामध्ये अधिक उत्पन्न आढळून आल्यास त्या लाभार्थ्यांची शिधापत्रिका थेट रद्द केली जाणार आहे.

## लग्न पंगतीतून वांगी-बटाटे गायब; पनीर नसेल तर वाटतो कमीपणा : शहरासह ग्रामीण भागातही पंगत पद्धती झाली गायब : बुफेला प्राधान्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

पूर्वी लग्न पंगतीत वांगे अन बटाट्याची भाजी हमखास असायची. लग्नसोहळ्यातील वांगे बटाट्याची भाजी बघूनच तोंडाला पाणी सुटायचे. मात्र आता कॅटर्स पद्धती आली. अन् बटाटे वांग्याच्या भाजीची जागा पनीरने घेतले. अपवाद वगळता सर्व ठिकाणी पनीरच दिसून येते. मात्र यामुळे लग्न पंगतीतील वाग्यांच्या भाजीची लज्जतच गेल्याचे दिसून येत आहे.




२१ व्या शतकात लग्नसोहळा साजरा करण्याची पद्धतीत मोठे बदल झाले आहे. मोठ-मोठ्या इव्हेंट कंपन्या लग्नसोहळा साजरा करण्यासाठी मार्केटमध्ये उतरल्या आहेत. परंतु, या देखाव्याच्या जगात पूर्वीचे लग्नसोहळ्याच्या पद्धती कालबाह्य होत आहेत.तर केवळ महाप्रसाद पुरती आता आलू वांग्याची भाजी समित राहिली आहे.पूर्वी लग्नाच्या पंगतीत वांगे-बटाट्याचा मेनू हमखास दिसून येत होता. मात्र आता कॅटर्सच्या जमान्यात पंगतीतील मेनू दिसेनासे झाले आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या दिसून येतआहेत. यासाठी शंभर रुपयांपासून वाढलेल्या पदार्थानुसार त्याचे दर निश्चित केले जातात.दिमाखदार सोहळ्यात लग्न करणे ही आजकालची फॅशन झाली आहे. त्यामुळे आता जेवणात फॅन्सी, आकर्षक खाद्यपदार्थ दिसून येतात. नागरिकही आनंदाने पसंती देत असतात.

**लग्नात केटरिंगवर लाखोंचा खर्च**

लग्नसोहळे आता दिमाखदार करण्यात येतात. बहुतांश जण लाखांनी खर्च करतात. ज्युस, मच्युरिअन, वेफर्स, गुपचुप, दोसा, पान आदींपासून वेगवेगळे खाद्यपदार्थ केटरिंगवर दिसून येत आहे. एका प्लेटमागे पाचशे ते दीड हजारांपर्यंत खर्च करत असल्याचे दिसून येते.

**७० टक्के लग्नात पनीरची मागणी**

आता बहुतांश लग्नात पनीरची मागणी करण्यात येते. केवळ अपवाद वगळता ग्रामीण भागात पनीरची भाजी दिसत नाही. बुफे पद्धतीत तर पनीरलाच प्राधान्य दिले जाते. वांगे बटाट्याची भाजी दिसून येत नाही. पूर्वीची पंगतीतील घट्ट बेसन, भाकर आता बुफेच्या मेनूमध्ये दिसून येते.

## धामणगावात शनिवारी वीर हनुमान लॉनमध्ये होणार हनुमंतरायांचा जागर सुंदरकांडाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ धामणगाव रेल्वे**

श्रद्धा, धैर्य आणि भक्तीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या हनुमानाच्या जन्मोत्सवानिमित्त उद्या श्री वीर हनुमान लॉन येथे हनुमंतरायाचा जागर होणार असून विविध धार्मिक कार्यक्रमासह सुंदरकांडाचे आयोजन करण्यात आले आहेधामणगाव -अंजनसिंगी रस्त्यावर जुना धामणगावं लगत श्री वीर हनुमानलॉन आहे येथे लहान मुलांना विविध खेळाचे साहित्य स्विमिंग टँक विवाह



समारंभासाठी सभागृहाच्या विविध सोयी सुविधा आहेत येथे स्व. सतीश बुधलानी यांनी अनेक वर्षांपूर्वी हनुमानाचे मंदिर बांधून मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. या मंदिरात दर शनिवारी आणि मंगळवारी भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होते. स्व सतीश बुधलानी यांचे पुत्र विक्रम बुधलानी हे येथील लॉन मधील मंदिरात दरवर्षी हनुमान जयंती विविध कार्यक्रमाने साजरी करतातसंकटमोचन, बलोपासनेसह बुद्धीची देवता म्हणूनही ज्याकडे पाहिले जाते अशा महाबली हनुमानाची जयंती निमित्त येथे पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लागणार आहे येथील या मंदिरात हनुमान चालिसा पठण, स्तोत्र पठण, महाआरती, महारुद्र अभिषेक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे श्री हनुमंताला रुईचा हार, पंचामृत आणि तेल वाहण्यात येणार आहे सकाळी नऊ वाजता सुंदर कांडाचे आयोजन करण्यात आले असून महा आरती नंतर दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या महाप्रसादाला लाभ घेण्याचे आवाहन विक्रम बुधलानी यांनी केले आहे.

# परतवाडा अमरावती महामार्गावर निंबाचे झाड कोसळल्याने एक तास वाहतूक ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

गुरुवार दिनांक दहा रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास वलगाव परिसरात तुफान वादळी वाऱ्यासह सुसाट वेगाने हवा सुटली अश्यातच अमरावती परतवाडा महामार्गावर असलेल्या हॉटेल अर्जुन रेस्टॉरंट जवळ एक निंबाचे झाड कोसळले हि सर्व घटना वलगाव पोलिसांना



माहित पडताच वलगाव पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले व सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली कटर मशीन व जेसीबीच्या सहाय्याने निंबाचे झाड रस्त्याच्या बाजूला करण्यात आले दुचाकी व चारचाकी चालकांना रस्ता मोकळा करून देण्यात आला मात्र अचलपूर अंजनगाव सुर्जी चिखलदरा धारणी या चार तालुक्यातील वाहतूक एक तास ठप्प झाली होती सुदैवाने यात कुठलीही जिवीत हानी झाली नाही मात्र प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला आहे.